सुविचार
आदर प्राप्त करने का एकमात्र उपाय यह है कि पहले आप दूसरों का आदर करें ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१७९ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## आमच्या बहिणींच्या कोणी आडवे आले तर गाठ माझ्याशी



पुणे : मी एकच सांगतो की एकवेळा आमच्यावर टीका केली तर आम्ही सहन करू. मात्र, आमच्या बहिणींच्या हिताच्या आडवं कोणी आलं तर मग गाठ माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा, असा सज्जड इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिला.

महायुती सरकारने काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेची मोठी चर्चा आहे. मात्र, या योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. आता जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचा निधी महिलांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवरच आज पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ पार पडला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत इशारा दिला.

(पान ७ वर)

## ४ राज्यांत एकत्र निवडणुका घेऊन दाखवा

### शरद पवार यांचे पंतप्रधान मोदींना आव्हान



नागपूर : प्रतिनिधी- काल केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांच्या विधानसभेची निवडणूक जाहीर केली. हे सरकार देशात अद्याप चार राज्यांत एकत्र निवडणुका घेऊ शकत नाही. देशाचे पंतप्रधान बोलतात त्यात कुठलेही सत्य उरले नाही. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ४ राज्यांत एकत्र निवडणुका घेऊन दाखवा, असे थेट आव्हान शरद पवार यांनी सरकारला केले आहे.

दरम्यान, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने दिल्लीतील लाल किल्ल्यावरून भाषण करत देशाला संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी देशात वन नेशन, वन इलेक्शन असेल, अशी घोषणा केली होती.

देशाची राजधानी नवी दिल्ली येथे काल केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडली. या निवडणुकीत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी जम्मू-काश्मीर आणि हरियाणा राज्याच्या विधानसभेची निवडणूक जाहीर केली. निवडणूक आयोगाच्या नियोजनानुसार जम्मू-काश्मीरची विधानसभा निवडणूक तीन टप्प्यांमध्ये पार पडेल. तर, हरियाणाची निवडणूक एका टप्प्यात होणार आहे.

दोन्ही राज्यांच्या निवडणुकीचे निकाल ४ ऑक्टोबरला जाहीर (पान ७ वर)

## बांगला देश हिंसाचारात आतापर्यंत ६५० जणांचा बळी

ढाका : शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर बांगला देशमध्ये माजलेल्या अराजकतेनंतर झालेल्या हिंसाचारात सुमारे ६५० लोकांचा मृत्यू झाला आहे. हिंसाचार, अटक आणि हिंसाचार, अटक आणि न्यायालयीन कोठडीत मृत्यूच्या घटनांचा तपास निष्पक्ष आणि पारदर्शकपणे व्हायला हवा असे संयुक्त राष्ट्रांनी ( यूएन) आपल्या अहवालात म्हटले आहे.

बांगला देशातील हिंसाचारावर संयुक्त राष्ट्राने १० पानी अहवाल शुक्रवारी प्रसिद्ध केला. मृतांमध्ये आंदोलक, पत्रकार आणि विविध दलांचे सुरक्षा कर्मचारी यांचा समावेश आहे. या हिंसाचारात हजारो लोक जखमीही झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, १६ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान झालेल्या हिंसाचारात सुमारे ४०० जणांचा मृत्यू झाला. ५-६ ऑगस्ट रोजी झालेल्या हिंसाचारात सुमारे २५० लोकांना आपला जीव गमवावा लागला होता, त्यामुळे शेख हसीना यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. विविध मीडिया रिपोर्ट्स आणि आंदोलनकारी संघटनांनी असेही म्हटले होते की जुलै ते ऑगस्ट दरम्यान आरक्षण विरोधी आंदोलनात ६०० लोकांचा मृत्यू झाला होता.

मृतांचा आकडा वाढू शकतो (पान ७ वर)

## ८४ खेळाडूंचे पथक पॅरिस पॅरालिम्पिकसाठी रवाना

नवी दिल्ली : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ नंतर आता पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धा २८ ऑगस्टपासून सुरू होणार असून, ८ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. या खेळांसाठी भारतीय पॅरालिम्पिक संघ शुक्रवारी रवाना झाला. यापूर्वी, भारतीय पॅरालिम्पिक समिती आणि केंद्रीय क्रीडा मंत्र्यांनी भारतीय दलासाठी एका भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात नांदेडची गोळाफेकपटू भाग्यश्री जाधव आणि भालाफेकपटू सुमित अंटील ध्वजवाहकाची भूमिका बजावणार आहेत.

भारतीय संघात तिरंदाजी, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, कॅनोइंग, सायकलिंग, अंध ज्युडो, पॉवरलिफ्टिंग, रोइंग, नेमबाजी, पोहणे, टेबल टेनिस आणि तायक्वांदो यासह १२ खेळांमधील ८४ खेळाडूंचा समावेश आहे. पॅरालिम्पिकमध्ये भारताचा हा सर्वात मोठा तुकडी आहे. टोकियोमध्ये ५४ ॲथलीट्सच्या टीमने भाग घेतला होता.

या समारंभात केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया म्हणाले की, आमच्या पॅरा ॲथलीट्समध्ये अडथळ्यांवर मात करण्याची आणि आव्हानांना संधींमध्ये बदलण्याची उल्लेखनीय क्षमता आहे. त्यांनी पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ च्या तयारीत दृढनिश्चय आणि चिकाटी दाखवली आहे. भाग्यश्री जाधव आणि सुमित (पान ७ वर)

## मुरुड येथील १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामाचा आ. कराड यांच्या हस्ते शुभारंभ




लातूर / प्रतिनिधी- केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून लातूर तालुक्यातील मुरुड येथील १० कोटी ७८ लाख रुपये खर्चाच्या विविध कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या हस्ते शुक्रवारी उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. महायुती शासनाने मंजूर केलेल्या निधीचे आणि लाडकी बहीण योजनेला पूर्वी विरोध करून आता जिल्हा बँकेत शून्य रकमेत खाते उघडण्याच्या नावाखाली लाडकी बहीण योजनेचे श्रेय लाटण्याचा काँग्रेसच्या आमदारांनी प्रयत्न करू नये, असा इशारा यावेळी आमदार कराड यांनी दिला.

मुरुड ग्रामपंचायत भाजपच्या ताब्यात आल्यापासून भाजपचे नेते आमदार कराड यांच्या माध्यमातून मुरुड शहराच्या विकासाला गती मिळाली. मुरुड ग्रामपंचायतीतर्फे आयोजित 'घर तेथे झाड' या वृक्षारोपण योजनेचा शुभारंभ, ६२ सिंचन विहिरी व १७५ गायगोठा मंजूर असलेल्या शेतकऱ्यांना धनादेशाचे वाटप, आमदार स्थानिक निधीसह केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेतून श्री ज्ञानेश्वर मंदिर सभामंडप, अंतर्गत सिमेंट रस्ते, सिमेंट नाली बांधकाम, ओपन जीम, पेव्हर ब्लॉक रस्ता, अंगणवाडी बांधकाम, जिल्हा परिषद शाळेत सोलार, शिवरस्ता, समाज मंदिर दुरुस्ती आदी कामाचे लोकार्पण तसेच दत्त मंदिर सभागृह, (पान ७ वर)

## एस.जी. फिटनेस सेंटरचे उद्घाटन महिलांच्या आरोग्यासाठी जिम बांधणे



लातूर : महिलांच्या आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन लातूरमध्ये प्रथमच फिटनेस सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. या ठिकाणी दुपट्टा कसरत, स्ट्रेचिंग, दांडिया एवढेच नाहीतर झुंबा, योगासनेही होतात. आज या फिटनेस सेंटरचे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोकजी गानू, डॉ.मोहनीताई गानू, डॉ.आरतीताई झंवर, मा. नगरसेविका स्वातीताई लोंढे, संगीतजी रंदळे, प्रशिक्षक साक्षीताई पाटील, पाचेगावकर मॅडम उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेबजी चाकूरकर यांनी केले.



# हेर ग्रामस्थांकडून अक्षित हेरकर यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** हेर ता.उदगीर येथील शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अक्षित हेरकर यांची किनवट विधानसभा मतदारसंघ निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्ती बदल हेर येथील ग्रामस्थांनी (ता .१४)त्यांचा हेर येथील ज्ञानदीप सार्वजनिकवाचनालयात सत्कार केला.ग्रामस्थांच्यावतीने आयोजित या कार्यक्रमात हेरकर यांच्या नेतृत्वाबद्दल आणि पक्षासाठी त्यांच्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढण्यात आले. हेरकर यांनी या नियुक्तीबद्दल आभार व्यक्त करताना पक्षाच्या विकासासाठी आणिस्थानिक जनतेच्या समस्यांवर लक्ष केंद्रीत करण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांच्यायासत्काराने हेरकर यांना अधिक प्रेरणा मिळाली आहे . असे म्हणाले यावेळी माजी सभापती सोपानराव ढगे,तंटामुक्ती अध्यक्ष बळवंत घोगरे, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष वसंत ढगे, संघराज शेलार, बालाजी येणगे,गुंडेराव जोशी,रणजित थोरवे पाटील,खुमांशू पवनीकर:, स्वयंम वाघमारे, माधव हेरकर, माधव घोणशीकर, माधव मोहाळे, पपन सूर्यवंशी, व्यंकट कांबळे, सुरेश कांबळे, विठ्ठल सोनकांबळे, राम भट्ट,दिलीप कांबळे,दिनकर मगर, दत्तात्रय सोनकांबळे यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित.

# एकुर्का येथे कृषि कन्यांद्वारे स्वतंत्र्यदिन साजरा



**उदगीर (प्रतिनिधी)** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाशी संलग्नित,कृषीमहाविद्यालय डोंगरशेळकी तांडा, उदगीर येथे बी.एससी.कृषि पदवीच्या ७व्या सत्रातील विद्यार्थिनींनी मौजे एकुर्का रोड या गावात ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव कृषि औद्योगिक संलग्नता वर्ष २०२४-२५ या अंतर्गत एकुर्का रोड गावामध्ये ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांची देशभक्तीपर नारे देत गावात प्रभात फ़ेरी काढण्यात आली, यानंतर नियोजित वेळेमध्ये ध्वजारोहण संपन्न झाले. ध्वजारोहणानंतर समाजामध्ये एक चांगला संदेश निर्माण व्हावा म्हणून तंटामुक्ती अध्यक्ष आकाश गुंडारे यांच्यामार्फ़त गावात शांततेचा संदेश देण्यात आला . त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये गावातील जेष्ठ नागरिक व माजी सैनिक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून इ. १ली ते ७वी या वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाच्या निमित्ताने अध्यक्ष म्हणून गावचे प्रथम नागरिक सरपंच श्रीमती.चंद्रकला कांबळे, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक आर.पी. चव्हाण सर, सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, गावातील पोलीस पाटील विश्वासराव नारळे, माजी गटविकास अधिकारी विनायकराव पाटील , माजी चेअरमन चंद्रकांत साळुंके, गावातील प्रगतशील शेतकरी गोपाळ कोदळे ,गोविंद माकने दत्तात्रय गोलेवार, रामकिसन जाधव आदींनी उपस्थिती दर्शवली.

कृषि महाविद्यालयातील कृषिकन्या कु. वैष्णवी पंढरपूरे, वैष्णवी पाटील,नंदिनी लोणकर ,सुप्रिया पालटवाड व अंजली कांबळे या कृषीकन्या उपस्थित होत्या.

आयोजित कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अंगद सूर्यवंशी, उपप्राचार्य अशोक पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. शिवशंकर वानोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा.स्नेहा मून व विषय तज्ञ डॉक्टर दिपाली कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३८२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Bhushan Shrikrushna Kulkarni हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक १८.१०.२०२३ रोजी At. Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Amod Bhushan Kulkarni, Age-36, Occu. - Business
2) Shilpa W/o. bhushanrao Kulkarni, Age-60, Occu. - H.H.
Both R/o Anand Nagar, Nanded Naka Udgir Tq.Udgir Dist.latur
यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Amod Bhushan Kulkarni | 36 | Son |
| 2) | Shilpa W/o. bhushanrao Kulkarni | 60 | Wife |

अर्जदार यांना Bhushan Shrikrushna Kulkarni या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Bhushan Shrikrushna Kulkarni याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १२/०९/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६४३/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Laxman Narsingh Adekar हे दिनांक २३.०३.२०१० रोजी At. Udgir Tq.udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Deepak Laxman Aadekar Age 42 yrs, son
R/o Udgir Tq.udgir Dist.Latur
यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Deepak Laxman Aadekar | 42 | son |

अर्जदार यांना Laxman Narsingh Adekar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Laxman Narsingh Adekar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०४/१०/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६१९/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Shivaji Trimbakrao Javare हे दिनांक ११.०६.१९८४ रोजी Nanded येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1) Nirmalabai W/o Shivaji Javare, Age 77 yrs, Occu. Homemaker, Res. Shirol Janapur, Tal. Udgir, Dist.Latur.
2) Jyoti W/o Narayan Patil, Age 31 yrs, Occ. Homemaker, Res. Takali, Tal. Deoni, Dist.Latur.
यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| ) | Nirmalabai W/o Shivaji Javare | 77 | Wife |
| 2) | Jyoti W/o Narayan Patil | 31 | Daughter |

अर्जदार याने Shivaji Trimbakrao Javare या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Shivaji Trimbakrao Javare याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १८/०९/२०२४

ए.बी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र. ८६/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे व इतर ज्यापेक्षा आई नामे सिमिंताबाई उर्फ लक्ष्मीबाई भ्र. विश्वनाथ अंकुलगे हे दिनांक १४/०१/२०२० रोजी मौजे जवळगा या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे जवळगा ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | सुर्यकांत पिता विश्वनाथ अंकुलगे | ७० | मुलगा |
| २) | कस्तुरबाई हवगीराव भालके | ६८ | मुलगी |
| ३) | भारतबाई वैजनाथ जिवने | ६६ | मुलगी |
| ४) | सोजरबाई बाबुराव फत्तेपुरे | ६२ | मुलगी |
| ५) | प्रभाकर पिता विश्वनाथ अंकुलगे | ६० | मुलगा |
| ६) | बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे | ५८ | मुलगा |

अर्जदार बालाजी पिता विश्वनाथ अंकुलगे व इतर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १९/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०२/०८/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६२५/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील नामे Dhondiram Bhojappa Rayewar, R/o Near Bus Stand, Jalkot Tq.Jalkot Dist.Latur हे दिनांक १४.०५.२०२४ रोजी Jalkot Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार
Raghvendra Dhondiram Rayewar,
Age 56 yrs, Occu. H.H.
R/o Near Bus Stand, Jalkot Tq.Jalkot Dist.Latur
यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1 | Sharau Dhondiram Rayewar | 66 | Wife |
| 2 | Raghvendra Dhondiram Rayewar | 45 | Son |
| 3 | Vaibhav Dhondiram Raywar | 34 | Son |
| 4 | Prachi S/o. Dhondiram Rayewar (Prachi W/o. Sandip Rudrawar) | 39 | Daughter |

अर्जदार याने Dhondiram Bhojappa Rayewar, या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dhondiram Bhojappa Rayewar, याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २१/०९/२०२४

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुतराळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४८७/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, हे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी At.Sasun Hospital, Pune येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Tulja W/o. Prabhakar Karadkhelkar Deshpande, Age 66 yrs, Occu. H.H. R/o. Behind Nagar Parishad, Nai abadi Udgir Dist. Latur All R/o. At. Bamani, Tq.Udgir dist.Latur
यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Tulja W/o. Prabhakar Karadkhelkar Deshpande | 66 | Mother |

अर्जदार यांना Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Padmakar S/o. Prabhakar Karadkhelkar, याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०८/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३५/२०२४ नि.क्र.

ज्यापेक्षा नामे देविदास विश्वनाथ कुंभार हे दिनांक ०९.०४.२०१६ रोजी गदम (कर्नाटक) येथे मयत झाले आहेत. व अर्जदार नं. १ ते ३

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kaushalbai Devidas Kumbhar | 57 | Wife |
| 2) | Govind Devidas Kumbhar | 30 | Son |
| 3) | Gopal Devidas Kumbhar | 29 | Son |

अर्जदार यांना Devidas Vishwanath Kumbhar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Devidas Vishwanath Kumbhar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०९/२०२४

कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६३४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Balbhim S/o. Kishanrao Kulkarni हे R/o Udgir Tq.Udgir Dist.Latur हे दिनांक १०.०६.२०२४ रोजी At. Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Radheshyam S/o. Balbhimrao Walsangkar@Kulkarni, Age 44, Occu- Business
2) Ashabai W/o. Balbhimrao Kulkarni Age 68, Occu. H.H.
Both R/o. Brahman Galli, Udgir Tq.Udgir Dist.Latur
3) Archana W/o Giridhar Kulkarni, Age 46, Occu- H.H.
R/o. Salbatpur Tq. Madnur Dist. Nizamabad (Telangana State)
यांनी खालील नमुद ३ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Radheshyam S/o. Balbhimrao Walsangkar @Kulkarni | 44 | son |
| 2) | Ashabai W/o. Balbhimrao Kulkarni | 68 | Wife |
| 3) | Archana W/o Giridhar Kulkarni | 46 | Daughter |

अर्जदार यांना Balbhim S/o. Kishanrao Kulkarni या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Balbhim S/o. Kishanrao Kulkarni याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०९/२०२४

के.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक, २ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर











**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

१,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) / डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार / ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com




## आज धाराशिव मध्ये भव्य बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – शहरातील अजहर पठाण व एम एस फिटनेस क्लब यांच्यावतीने उस्मानाबाद श्री २०२४ बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे आयोजन दि.१८ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे.

धाराशिव शहरातील गाजी मैदान येथे आज सायंकाळी ५ वाजता या स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रमोद काटे नॅशनल जज,शफी शेख नॅशनल जज, नजीर शेख व संतोष कुलकर्णी हे काम पाहणार आहे. या स्पर्धे चे उद्घाटन धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त बॉडी बिल्डर स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अजहर पठाण, मुक्तार शेख यांनी केले आहे.




# अनेक महिलांच्या खात्यावर जमा झाले मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – महिला आणि मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी तसेच महिला आणि त्यांच्यावर अबलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी राज्य सरकारने महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे.या योजनेतील लाभार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येपासून म्हणजेच १४ ऑगस्टपासून सुरुवातीचे दोन हप्ते जमा होण्यास सुरुवात झाली आहे.जिल्हयातील अनेक महिलांच्या खात्यावर या योजनेची रक्कम जमा झाली आहे. त्यामुळे महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून त्यांना आत्मनिर्भर होण्यास या रक्कमेची मदत होणार असल्याचे महिलांमधून बोलले जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पहिले दोन हप्ते रक्षाबंधनाच्या पूर्वी जमा करण्यात येतील,अशी घोषणा राज्य सरकारने केली होती. मात्र स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येलाच महिलांच्या खात्यामध्ये ३ हजार रुपये जमा झाले आहेत. यामुळे महिलांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. ज्या महिलांनी ३१ जुलैपूर्वी अर्ज दाखल केले होते, अशा महिलांच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्या लाभार्थ्यांना जून आणि जुलै महिन्याचे मिळून ३ हजार रुपये मिळाले आहेत. ज्या महिलांनी यानंतर अर्ज भरले आहेत. त्यांना १७ ऑगस्ट रोजी या योजनेतील पैसे जमा होतील, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. यापूर्वी या योजनेतील एक रुपया ट्रायल म्हणून महिलांच्या खात्यामध्ये जमा झाला होता. त्यानंतर आता आणखी एका टप्प्यात महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाले आहेत. उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यात दोन हप्त्यांचे पैसे लवकरच जमा करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या बँक खात्याशी आधार क्रमांक जोडण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांच्या बँक खात्यात प्रतिमाह १५०० रुपये जमा होणार आहेत.

### भावाकडून मिळालेली भेट महत्वाची

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महिलांना खुप उपयोगी पडणारी आहे.गेल्या दोन महिन्याचे हप्ते मला मिळाले आहे. शासन भावाकडून बहीणला मिळालेली ही भेट महत्वाची असून राज्य शासनाचे खुप खुप आभार व्यक्त करते.

– शिल्पा बेद्रे, लाभार्थी,
सांजा रोड,धाराशिव

### संसाराचा गाडा हाकण्यासाठी होईल उपयोग

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन महिन्याचे हप्ते माझ्या खात्यावर जमा झाले आहेत.याचा माझ्या कुंटूंबाला फायदा होणार आहे. या योजनेतून मिळणारे पैशाचा उपयोग माझ्या संसाराचा गाडा चालविण्यासाठी होणार असून ही योजना शासनाने कायमस्वरुपी सुरु ठेवावी. राज्य शासनाचे खूप खूप आभार व्यक्त करते.

– अफरीन शेख,
लाभार्थी, सांजा रोड, क्रांती नगर.

## दोन समाजामध्ये तेढ निर्माण केल्याप्रकरणी रामगिरी महाराजांना अटक करावी

परंडा दि.१७ (प्रतिनिधी) – दोन धर्मियांमध्ये जाणुनबुजुन जातीय तेढ निर्माण करुन धार्मिक कलह व द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांच्यावर गुन्हा दाखल करुन तातडीने अटक करण्यात यावी अशी मागणी परंडा येथील सकल मुस्लिम समाजाच्यावतीने तहसिलदारांच्या मार्फत राष्ट्रपतींकडे एका निवेदनाद्वारे दि.१७ ऑगस्ट रोजी केली आहे.




दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सरला बेट येथील रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांनी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथील सप्ताह दरम्यान प्रवचनामध्ये उपस्थित जनसमुदायासमोर मुस्लिम धर्माची व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल, असे जाणिवपूर्वक प्रवचन केले आहे. भारतात २ कोटींपेक्षा अधिक मुस्लिमांनी इस्लाम सोडला आहे. १०–२० बर्षे ज्यांनी मौलाना म्हणून काम केले आहे. त्यांनी इस्लामचा सुक्ष्म अभ्यास केला असता, त्यांना यामध्ये अन्याय–अत्याचाराशिवाय काहीही आढळून न आल्याने त्यांनी इस्लाम धर्म सोडून दिला आहे. तर मोहम्मद पैगबर यांनी वयाच्या ५० व्या वर्षी ६ वर्षाच्या मुलीसोचत विवाह केला. ज्यांचे आदर्शच अत्याचारी आहेत, त्यांच्याबाबत अजून काय सांगायचे ? अशा स्वरुपात त्या प्रवचनामध्ये मुस्लिम धर्मियांबाबत मोठ्या प्रमाणावर अनेक वक्तव्ये त्यांनी केली आहेत. या वक्तव्यामुळे व अशा प्रकारच्या प्रवचनामुळे हिंदू–मुस्लिम या दोन समाजामध्ये मने कलुषित करुन जातीय तणाव, धार्मिक द्वेष पसरवण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी अशा रामगीरी महाराजाकडून मुस्लिम धर्मियांविरोधात जाणुनबुजुन धार्मिक भावना दुखवून जातीय दंगल घडविण्याच्या इराद्यात व्यक्तव्य करुन घेण्यात येत असल्याचे समजते. तसेच नितेश राणे हे सुध्दा दोन समाजात धार्मिक तेढ निर्माग करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवावा म्हणून जाणुनबुजुन चिथावणीखोर भाषण करत आहेत. विशेष म्हणजे

मुस्लिम समाजात अनेक ठिकाणी इज्तेमा होतात. त्यामध्ये फक्त इस्लाम विषयी प्रवचन देऊन माणसाने समाजात माणूस म्हणून कसे जगावे ? याबाबत शिकवण दिली जाते. कोणत्याही धर्म व जाती विरोधात कोणत्याही प्रकारचे वक्तव्ये केली जात नाहीत. मात्र रामगीरी महाराजाने केलेल्या वक्तव्यामुळे समाज जीवनातील एकोपा, सामाजिक बंधूभाव धोक्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे. सध्या गणेशोत्सव तोंडावर आलेला आहे. पाठोपाठ महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका येणार आहेत. त्यामुळे आपण समस्येचे गांभीर्य ओळखून रामगीरी महाराजांवर विविध कलमांतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करन त्यांना अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## मांजरा शुगर कारखान्याच्या आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान मेळाव्यात प्रतिसाद

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर (कंचेश्वर ) इंडस्ट्रीज प्रा.लि, कारखाना सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे वाटचाल करत आहे.




कारखान्याने कार्यक्षेत्रातील तसेच आसपासच्या भागातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता कारखाना व्यवस्थापनाने ऊस विकास योजना राबविण्याचे धोरण ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि.१६ ऑगस्ट रोजी कारखान्यामार्फत तालुक्यातील मौजे काडगांव येथे ऊस विकास योजने अंतर्गत...आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान....या विषयावरती शेतकरी मेळावा घेण्यात आला. सदर मेळाव्या प्रसंगी उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टियुटचे माजी शास्त्रज्ञ डॉ. सुरेश माने पाटील यांनी मार्गदर्शन केले.

राज्यात ऊस हे नगदी पीक असून ते घटत आहे. उत्पादकता ही प्रमुख उत्पादकांपुढील समस्या आहे. तर दुसरीकडे एकरी १०० टन किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादन घेणारे अनेक शेतकरी आहेत. योग्य हंगामात ऊस लागवड, आंतरपिके लागवडीच्या सुधारीत पध्दती, जमिनीची सुपीकता, योग्य पध्दतीने पुर्व मशागती, खतांचा एकात्मिक वापर, चांगल्या बेण्याची निवड, रोग व तणाचे योग्य व्यवस्थापन, आधुनीक ऊस लागवड तंत्रज्ञानाचा वापर केल्यास एकरी ऊस उत्पादनात वाढ होत असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे यांचे माजी शास्त्रज्ञ डॉ. माने पाटील यांनी दि. १६ ऑगस्ट रोजी कार्यक्षेत्रातील काडगांव येथे शेतकरी मेळाव्यात केले. कारखान्याने दि. १६ ते १९ ऑगस्ट चे दरम्यान प्रत्येक दिवशी सकाळी व सायंकाळी या सत्रात शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्याची सुरुवात दि.१६ ऑगस्ट रोजी करण्यात आली.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक माजी शास्त्रज्ञ डॉ. सुरेश माने पाटील, सरपंच अशोक माळी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सतीश गिराम, माजी जिल्हा परिषद सदस्य चांनावर, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन बब्रुवान शिंदे, पोलीस पाटील साधु माळी, कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे, जनरल मॅनेजर (टेक्नी., अजीत कदम, मुख्य शेतकी अधिकारी, नारायण धांडे, ऊस विकास अधिकारी शशिकांत बुलबुले, ऊस पुरवठा अधिकारी पद्माकर लोमटे आदींसह विभाग प्रमुख, गट प्रमुख व शेतकरी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

## अनंत छाया ॲग्रो प्रोडूसर कंपनीने शेतकऱ्यांची केली फसवणूक

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – शेतकऱ्यांचे सोयाबीन व हरभरा योग्य भावात खरेदी केले. वायदे बाजार दरानुसार १५ दिवसांत बिल देणार असल्याची शेतकऱ्यांना थाप मारली. मात्र दोन वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे रक्कम दिलेली नाही. हे फसवणुकीचे कारस्थान अनंत छाया ॲग्रो प्रोडूसर कंपनीच्या संचालकांनी केले आहे. संबंधित शेतकरी कंपनीकडे बिलासाठी उंबरठे झिजवीत आहेत. मात्र संबंधित संचालक शेतकऱ्यांना आश्वासन देऊन झुलविण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे सहानुभूतीपूर्वक विचार करून त्या सर्व संचालकावर फौजदारी कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी रत्नापूर, कडकनाथवाडी, वाघोली, उपळाई, उक्कडगाव व मलकापूर आदी गावच्या शेतकऱ्यांनी पोलीस अधीक्षकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या नियोजनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव शहरातील एमआयडीसीमध्ये असलेल्या अनंत छाया अग्रो प्रोडूसर कंपनी लि. च्या संचालकांनी डिसेंबर २०२२ ते २०२३ या दरम्यान जिल्ह्याच्या विविध भागातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन आम्ही तुमचे सोयाबीन व हरभरा योग्य भावात खरेदी करतो. वायदे बाजारानुसार १५ दिवसांमध्ये त्या मालाचे बिल तुम्हाला दिले जाईल, अशी थाप मारून त्यांच्याकडून खरेदी केला. मात्र अद्यापपर्यंत या कंपनीने या शेतकऱ्यांना बिलाची रक्कम दिलेली नाही. त्यामुळे त्यांची फसगत झाल्याचे लक्षात आले असून त्यांनी पोलीस अधीक्षकाकडे धाव घेत कंपनीच्या सर्व संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून आम्हाला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे. फसगत झालेल्या शेतकऱ्यांमध्ये अतुल मुळे, ज्योती मुळे, स्वाती मुळे, चंद्रकांत जाधवर, मनसुख




सय्यद, वैशाली माळी, सिद्धेश्वर पंचवीसे, वसंत धालगुडे, श्रीकांत मनगिरे, संतोष लोमटे, उमेश मगर, भालचंद्र पिंगळे, कैलास क्षीरसागर, औदुंबर क्षीरसागर, मनोज शेळके, सुरेश पाटील, रामेश्वर शेंडगे, सिद्धेश्वर पौळ, आश्रुबा मुंडे, पांडुरंग मुंडे, विलास शेंडगे, राजाराम शेंडगे, रामलिंग मुंडे, नागाप्पा मुंडे, रामदास मुंडे, बालाजी दराडे, बळीराम गिराम, नागनाथ मुंडे, भीमराव वाघ, गहिनीनाथ दराडे, सुरेश दराडे, गोकुळ दराडे, पांडुरंग बारकुल, अंबऋषी बारकुल, आप्पाराव दराडे, दगडू धुमाळ, वसंत धालगडे, सुधीर धालगडे, आबाराव धालगडे, ज्ञानेश्वर वाळके आदींसह ५१ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

## बालनाट्य, परिसंवाद, लोककला आणि तमाशाने भारावले रसिक










धाराशिव दि.१७ दि.१७ (प्रतिनिधी) – 'या रावजी तुम्ही बसा भावजी पोटासाठी नाचते मी.. पर्वा कुणाची, इचार काय हाय तुमचा हो पाव्हणं इचार काय हाय तुमचा ? यासह वैविध्यपूर्ण ठसकेबाज लावण्या व अदाकारीने मन हेलावून टाकणारे नृत्य लोकनाट्य तमाशा मंडळाच्या सहकलाकारांनी सादर केल्या. शंभरव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त सांस्कृतिक महोत्सवात बालनाट्य, परिसंवाद, लोककला व तमाशाने रसिक भारावले. शिट्ट्या, टाळ्या व वन्स मोरच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद देत सभागृह दुसऱ्या दिवशी दि.१६ ऑगस्ट रोजी दणाणून गेले होते.

१०० व्या नाट्य संमेलनानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा धाराशिव यांच्यावतीने सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन १५ ते १८ ऑगस्ट दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात करण्यात आले आहे. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नटराजाचे पूजन करून, पुष्पहार अर्पण करून व सिने अभिनेते दिवंगत विजय कदम यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महोत्सवाचे स्वागताध्यक्ष धनंजय शिंगाडे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य विशाल शिंगाडे, नियामक मंडळाचे सदस्य नंदू कवाळकर, शाखेचे सल्लागार डॉ. अभय शहापूरकर, डॉ. राजकुमार मुसने, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर व उद्योजक सुमित कोठारी आदी उपस्थित होते.

तमाशा या कार्यक्रमामध्ये सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील मनव येथील महादेव मनवकर लोकनाट्य तमाशा मंडळाने आपली पारंपारिक कला सादर केली. यामध्ये महादेव मनवकर, शंकर मनवकर, शहाजी मनवकर, नवनाथ मनवकर तर ढोलकी वादक सागर मनवकर, हार्मोनियम गजानन लोहार, पारू कराडकर, रेणुका मलकापूरकर, सोनम काटे, सुनिता कराडकर, लंका कराडकर आदी कलावंतांनी भाग घेतला. यावेळी कलाकारांनी गण, गवळण, लावणी, बतावणी व वगनाट्य सादर केली.

खचाखच भरलेल्या सभागृहात तरुणाईने गाण्यावर ठेका धरला अन् मनसोक्तपणे नाचण्याचा आनंद लुटला. कलाकारांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी शिट्ट्या अन् टाळ्यांनी दाद देत सभागृह दणाणून सोडले. कलाकारांनीही आपल्या अदांनी अन् बहारदार लावण्या सादर करीत मने जिंकली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अर्चना टिळक, सुगत सोनवणे, डॉ. गणेश शिंदे, सागर चव्हाण उपाध्यक्ष (उपक्रम), सहकार्यवाह शरणम शिंगाडे, सल्लागार राजेंद्र अत्रे, डॉ. अभय शहापूरकर, सदस्य धनंजय कुलकर्णी, दयानंद साबळे, सुरेश देवकुळे, प्रमोद जोगदंड, श्रीकांत साठे, अर्जुन धावारे, विशाल टोले, भैरू कदम, प्रसेनजित शिंगाडे, ताहेर शेख, दिग्विजय शिंगाडे, शुभम खोत, विजय उंबरे, सुमित शिंगाडे, विश्वनाथ काळे, सुमेध चिलवंत, ऋषीकेश गवळी, यशवंत शिंगाडे, संकेत नागणे, अक्षय दिवटे, सौरभ शिंगाडे, प्रविण सोनवणे, प्रसाद वाघमारे, प्रज्ञावंत ओहाळ, प्रशांत कांबळे, सारिपुत शिंगाडे यांनी परिश्रम घेतले.

रविवार दि.१८ ऑगस्ट रोजी स्थानिक कलवंतांचे सादरीकरण, नाट्यकलेचा जागर, राष्ट्रीय पातळीवरील कलाकारांचा सत्कार व झाडीपट्टी नाटक आदी कार्यक्रम सादर होणार आहेत.

जागर लोककलेचा या कार्यक्रमात सहभागी कलावंताने आपली कला सादर केली. तर झाडीपट्टी या परिसंवादात डॉ. राजकुमार मुसने म्हणाले की, झाडीपट्टी हा विदर्भातील एक नाटक प्रकार आहे. मागील १५० वर्षांपासून लोक कलावंत ही कला सादर करतात. अनेक मोठ्या कलावंतांनी झाडीपट्टी नाटकांमध्ये काम केले आहे. या नाटक प्रकारामध्ये सर्वकाही थेटपणे सादर केले जाते. झाडीपट्टीच्या प्रत्येक नाटकांमध्ये मनोरंजना सोबतच समाज प्रबोधन ही केले जाते. येणारा काळ हा झाडीपट्टीसाठी सुवर्णकाळ असल्याचेही त्यांनी सांगितले.

# लातूरच्या विकासासाठीच माझी पायपीट : अजित पाटील कव्हेकर

## संवाद लातुरकरांशी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर / प्रतिनिधी- संवाद लातूरकरांशी या उपक्रमाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.या उपक्रमाच्या तिसऱ्या दिवशी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी प्रत्येक गल्लीतील लातूरकरांशी संवाद साधला. लातुरकरांच्या हितासाठीच ही पदयात्रा सुरू असल्याचे ते ठिकठिकाणी संवाद साधताना म्हणाले.

शनिवारी (दि.१७) सकाळी संवाद लातूरकरांशी ही यात्रा श्रीकृष्ण मंदिर (गोशाळा ) येथून शारदा कॉलनी, रेणुका नगर,बँक कॉलनी, केशवनगर,एसटी कॉलनी,काशी विश्वेश्वर मंदिर या परिसरात पोहोचली.

लातूर शहर मतदार संघाच्या विकासाचं व्हिजन घेऊन आम्ही घरोघरी जात आहोत.केंद्र आणि राज्य सरकारने दिलेल्या विविध योजनांची माहिती लोकांना सांगत आहोत.लातूर शहर मतदारसंघातील नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेत आहोत,अशी प्रतिक्रिया अजित पाटील कव्हेकर यांनी रॅली दरम्यान बोलताना दिली. सरकारी पातळीवर दिल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचतोय की नाही ?याचीही ते खातरजमा करत आहेत.एखाद्या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यावर




मार्ग काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. लातूर हे शैक्षणिक क्षेत्रात ओळख असणारे देशपातळीवरील एक महत्त्वाचे शहर आहे.या शहराला शैक्षणिक हब करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असून आजवर याविषयी इथल्या लोकप्रतिनिधींनी काहीही केले नाही,अशी टीका त्यांनी केली.येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत योग्य उमेदवार निवडून देण्याची वेळ आली आहे असे ते म्हणाले.

या रॅलीत भा.ज.पा. महिला मोर्चा लातूर शहर अध्यक्षा रागिणी यादव, मंडळ अध्यक्ष आबा चौगुले, संजय गिर, सुभाष सुलगूडले, बालाजी शेळके, नारायण लोखंडे, युवा मोर्चा शहर जिल्हा उपाध्यक्ष काकासाहेब चौगुले, मंडळ सरचिटणीस लक्ष्मीकांत खरटमोल, विश्वजीत पाटील कव्हेकर, महीला मोर्चा शहर अध्यक्षा जयश्री धूत्तेकर, युवा मोर्चा माजी शहर जिल्हाध्यक्ष गौरव मदने,भाजपा शहर उपाध्यक्ष किशोर जैन,रमाकांत बाराटे,भेटके विमुक्त आघाडी शहर जिल्हाध्यक्ष नवनाथ ढेकरे,ॲड.शीतल पाटील,रवी लवटे,ॲड.गणेश गोजमगुंडे, सागर घोडके, संतोष तिवारी, पंकज देशपांडे, चैतन्य फिस्के, आकाश पिटले, मंदार कुलकर्णी, महादेव पिटले, योगेश गंगणे, ऋषिकेश क्षीरसागर, आदित्य आकनगीरे, अभिजीत उन्हाळे, योगेश झिंजोटे, लक्ष्मण मोरे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# संसार उपयोगी भांड्याच्या सेट सहित इतर सर्व ३३ बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी त्वरीत करा अन्यथा आंदोलन!

लातूर/ प्रतिनिधी : - इमारत व इतर बांधकाम कामगारांना सुरेक्षेसह त्यांचे आरोग्य व इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने शासनाने कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. मात्र बांधकाम कामगारांसाठीच्या अनेक योजना या केवळ कागदावरच राहताना दिसत आहेत, असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी श्रीकांत मुद्दे असे म्हणाले की, सध्या महाराष्ट्राच्या बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकरामधून २५००० कोटी पेक्षाही जास्त रक्कम जमलेली आहे. ज्या प्रमाणात रक्कम जमली आहे, त्या प्रमाणात त्याचे लाभ कामगारांच्या कल्याणकारी योजना महाराष्ट्र शासनाकडून राबवल्या जात नाहीत.

त्याऐवजी महाराष्ट्रातील या मंडळाची सर्व कामे अत्यंत विलंबाने सुरू आहेत. वास्तविक २००९ साली महाराष्ट्र शासनाने असा निर्णय केलेला आहे की, बांधकाम कामगारांची कामे एका महिन्यात पूर्ण केली जातील; परंतु महाराष्ट्रामध्ये मात्र नोंदीत बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यावर त्याचे वर्ष श्राद्ध झाले तरी त्याला अंत्यविधीची रक्कम सुद्धा मिळत नाही.

नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहासाठी ५१ हजार रुपये देण्याची तरतूद आहे. परंतु मुलीचे लग्न झाल्यानंतर त्या मुलीला बाळ झाल्यानंतरही ती रक्कम त्याच्या बापाला आणि त्या मुलीला मिळत नाही, अशी स्थिती आहे. घरकुल योजना सुद्धा केवळ घोषणेतच आहे, हीच वस्तुस्थिती आहे.

सध्या बांधकाम कामगार नोंदणीचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून आश्चर्य म्हणजे आज जर नोंदणीचा अर्ज दाखल केला तर त्याची कागदपत्रे तपासून तो अर्ज मंजूर होण्यासाठी सध्या बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून ऑनलाइन पद्धतीने जून २०२५ च्या तारखा दिल्या जात आहेत. अशाही प्रकारे नोंदणीकृत बांधकाम कामगारांची चेष्टा या मंडळाकडून सध्या सुरू आहे. देशातील काही राज्यांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नवीन सायकली दिल्या जातात. महिला बांधकाम कामगारांसाठी नवीन शिलाई मशीन दिली जाते, इतकेच नव्हे तर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समिती संघटनेच्याच्या वतीने दाखल केलेल्या केसमध्ये आदेश केलेला आहे की, बांधकाम कामगारांना बोनस देण्याबाबत निर्णय करावा, पण त्याचीही अंमलबजावणी महाराष्ट्र शासन करीत नसून मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दररोज अपमान केला जात आहे.

यावेळी असेही सांगण्यात आले की, सध्या संसार उपयोगी भांडे मिळण्याचे सुरू आहे. वास्तविक रोख रक्कम मिळण्याऐवजी भांड्याचे साहित्य मिळत असल्यामुळे किमान संसार उपयोगी या वस्तू मिळत असल्यामुळे या वस्तू चालू राहणं गरजेचं आहे.

आठ दिवसांमध्ये राज्यातील सर्व थकीत अर्जांचा निपटारा कल्याणकारी मंडळाकडून नाही केल्यास राज्यातील बांधकाम कामगार आठ दिवसानंतर प्रत्येक जिल्ह्यामध्ये तीव्र आंदोलन करतील असा इशारा महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे प्रमुख निमंत्रक कॉ शंकर पुजारी यांनी बांधकाम कामगारांच्या नुकतंच झालेल्या मेळाव्यामध्ये दिला. नोंदणीकृत शेकडो बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या विधवांचे योजना असूनही आर्थिक सहाय्याचे अर्ज बांधकाम कामगार मंडळाकडून स्वीकारत नाहीत. परंतु कोट्यावधी रुपये देऊन कंत्राटदारांचे भले केले जात आहे, असेही यावेळी सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात केले आहे. यावेळी रमाकांत मुद्दे, बाबासाहेब भांडेकर, गोविंद मुद्दे, सचिन वाडीकर, नितीन धोत्रे आदी समाज बांधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक कर्ज देण्यात जिल्ह्यात अव्वल - कामतकर



धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) - शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट बँकांना शासन ठरवून देत असते. त्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी बँक व बँक प्रशासन सतत प्रयत्न करत असते. २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये बँकेला २७५.३० कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र बँकेने ३३ हजार ५२८ शेतकऱ्यांना ३४४ कोटी रुपयांचे पीक कर्ज म्हणजे उद्दिष्टाच्या १२५ टक्के वाटप करुन या बँकेने जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले असल्याची माहिती बँकेचे क्षत्रिय व्यवस्थापक अविनाश कामतकर यांनी दि.१७ ऑगस्ट रोजी दिली. धाराशिव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड, मुख्य सरव्यवस्थापक दत्तात्रय कावेरी व जिल्हा समन्वयक प्रशांत कुलकर्णी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना कामतकर म्हणाले की, बँकेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी डॉ सचिन उंबाशी यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींनी कौतुक केले असल्याचे त्यांनी सांगितले. तर बँकेच्यावतीने थकबाकीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी व्याजामध्ये सवलत असलेल्या आकर्षक महाग्रामीण किसान सन्मान योजना व महाग्राम अन्नदाता सहयोग योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे या योजनांचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. तसेच या बँकेच्या जिल्हाभरात ३७ शाखा असून या शाखांच्या माध्यमातून प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, महिला बचत गट कर्ज वाटप, विभागाच्या विविध योजना, वैयक्तिक कर्ज योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची संपर्क साधून त्यांना सेवा देण्याबरोबरच इतर कामे व्यवस्थित केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांकडून बँक कर्ज परतफेड करण्याचे प्रमाण देखील समाधानकारक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

# 'कोणती गॅरंटी नाही तो संघात असेल...' टीम इंडियाच्या 'स्पीड गन'बाबत जय शाह यांचे मोठे वक्तव्य

दिल्ली-भारताचा वेगवान गोलंदाज मयंक यादव सध्या बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आहे. या वेगवान गोलंदाजाने आयपीएल २०२४ मध्ये केवळ चार सामने खेळले, परंतु त्याने आपल्या वेगाने खळबळ उडवून दिली. मयंकने आयपीएल २०२४ मध्ये ६.९९ च्या इकॉनॉमीने सात विकेट घेतल्या. मयंक यादव-ला १५० पेक्षा जास्त वेगाने चेंडू फेकण्यात कोणतीही अडचण येत नव्हती. या काळात त्याने ताशी १५६.७ किमी वेगाने चेंडूही टाकला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह यांना टीम इंडियामध्ये त्याच्या खेळण्याच्या शक्यतांबद्दल विचारले असता ते म्हणाले की, खेळाडूची निवड होईल की नाही याची शाश्वती देऊ शकत नाही.जय शाह यांना मोहम्मद शमी आणि मयांक यादव यांच्या दुखापतीबाबतच्या अपडेटबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना जय शाह म्हणाले की, ''मोहम्मद शमीबद्दल तुमचा प्रश्न बरोबर आहे, पण मी मयंक यादवबद्दल कोणतेही उत्तर देऊ शकत नाही. कारण तो संघात असेल की नाही याची गॅरंटी नाही. पण तो एक चांगला वेगवान गोलंदाज आहे, आणि आम्ही त्याची काळजी घेत आहोत. कारण आम्हाला त्याची ऑस्ट्रेलियात गरज आहे. आयपीएल २०२४ मध्ये युवा वेगवान गोलंदाज मयंकने आयपीएलमध्ये पदार्पण करत सर्वांना प्रभावित केले.

# मराठमोळ्या अजिंक्य रहाणेचा साता समुद्रापार जलवा...

मुंबई-अजिंक्य रहाणे, हे असे नाव ज्यासाठी भारतीय क्रिकेट संघाचे दरवाजे बंद झाले आहेत. गेल्या वर्षी आयपीएलमध्ये त्याच्या स्फोटक फलंदाजीमुळे त्याला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये संधी मिळाली आणि त्याने चांगली कामगिरी केली. मात्र आता पुन्हा एकदा पुनरागमन करणे कठीण वाटू लागले, त्यामुळे रहाणेने काही वर्षात त्याचा फॉर्म पूर्णपणे बदलला आहे. वाढत्या वयाबरोबर रहाणे गोलंदाजांमध्ये वेगळीच दहशत निर्माण करत आहे. इंग्लंडमध्ये सुरु असलेल्या एकदिवसीय स्पर्धेत लीसेस्टरशायर आणि हॅम्पशायर यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्याने स्फोटक खेळी खेळली आणि संघाला विजयी करत उपांत्य फेरीत नेले.

संघ पोहोचला उपांत्य फेरीत : लीसेस्टरशायरकडून अजिंक्य रहाणेशिवाय पीटर हँड्सकॉम्ब आणि लियाम ट्रेव्हस्किस यांनीही लीसेस्टरशायरकडून अर्धशतके झळकावली. यांच्या खेळीमुळे संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात लेस्टरशायरने ३ विकेट्स राखून रोमांचक विजय नोंदवला. या विजयासह गतविजेता लीसेस्टरशायर संघ एकदिवसीय चषक स्पर्धेतील विजेतेपदापासून केवळ २ पावले दूर आहे. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या अजिंक्य रहाणेने ८६ चेंडूंत २ चौकार आणि ३ उत्कृष्ट षटकारांच्या मदतीनं ७० धावांची उत्कृष्ट खेळी केली.

२९० धावांचे होते लक्ष्य : नाणेफेक हारुन प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हॅम्पशायरकडून कर्णधार निक गुबिन्सचं शानदार शतक आणि अनुभवी लियामच्या अर्धशतकाच्या जोरावर हॅम्पशायर संघानं निर्धारित ५० षटकांत सात गडी गमावून २९० धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली. १८ वर्षीय तरुण डॉमिनिक केलीनंही डावाच्या शेवटी २० चेंडूत ३९ धावांची जलद खेळी केली. पण लीसेस्टरशायरची फलंदाजी पाहता ही धावसंख्या किरकोळ वाटली. या संघानं अखेरच्या षटकात ३ गडी राखून सामना जिंकला.

# धोनीसाठी बीसीसीआय उचलणार मोठे पाऊल, आयपीएल मध्ये जुना नियम पुन्हा लागू करणार?



दिल्ली-आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावात रिटेंशनला नियम काय असतील यावर अद्याप बीसीसीआयकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, बीसीसीआय चेन्नई सुपर किंग्जच्या विनंतीवरून एक जुना नियम पुन्हा लागू करणार असल्याचे म्हटले जात आहे. यामुळे भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीला संघात ठेवण्यासाठी चेन्नईला मदत होऊ शकते.बीसीसीआयकडून आयपीएलमध्ये एक नियम करण्यात आला होता की, जो खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होऊन ५ वर्षांपेक्षा अधिक काळ झाला आहे त्याला अनकॅप्ड खेळाडू म्हणून लिलावात सहभागी करून घेतलं जात होतं. हा नियम आयपीएलच्या २०२१च्या हंगामापर्यंत लागू होता. त्यानंतर तो नियम रद्द केला गेला. आता एका रिपोर्टनुसार, बीसीसीआयने आयपीएल फ्रँचाइजींसोबत बैठक घेतली होती. त्यात चेन्नईने पुन्हा हा मुद्दा उपस्थित करत नियम पुन्हा लागू करण्याची विनंती केलीय.चेन्नई सुपर किंग्जच्या या विनंतीवर इतर संघांकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद दिला गेला नाही. पण बीसीसीआय हा नियम पुन्हा लागू करण्याच्या विचारात आहे. या नियमामुळे चेन्नई सुपर किंग्जला महेंद्र सिंग धोनी त्यांच्या संघात अनकॅप्ड खेळाडू म्हणून खेळवता येईल.भारतीय संघाचा यशस्वी कर्णधार राहिलेल्या महेंद्रसिंह धोनीने हैदराबादमध्ये एका कार्यक्रमात बोलताना म्हटले होते की, आयपीएलमध्ये त्याचं भविष्य पूर्णपणे आगामी लिलावाच्या रिटेंशन नियमांवर अवलंबून आहे. यासाठी अजून बराच वेळ आहे. खेळाडूंना संघात ठेवण्यासाठी ते काय निर्णय घेतात ते बघावे लागेल. एकदा नियम आणि कायदे ठरले की मी निर्णय घेईन. पण हा निर्णय संघाच्या सर्वोत्तम हितासाठी असेल असंही धोनीने स्पष्ट केले होते.

धोनी आयपीएलमध्येही यशस्वी कर्णधारांपैकी एक आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने ५ वेळा विजेतेपद पटकावले आहे. आयपीएल २०२४ च्या सुरुवातीला संघाचे नेतृत्व त्याने सोडले होते. त्यानंतर ऋतुराज गायकवाडकडे जबाबदारी सोपवली होती. महेंद्रसिंह धोनीने आयपीएलमध्ये आतापर्यंत एकूण २६४ सामने खेळले आहेत. यात त्याने १३७ च्या स्ट्राइक रेटने ५ हजार २४३ धावा केल्या. ९५ वेळा तो नाबाद राहिला आहे. धोनीच्या नावावर आयपीएलमध्ये २४ अर्धशतके असून त्याला एकही शतक आतापर्यंत आयपीएलमध्ये झळकावता आलेले नाही.

## टि. सी. हरवली आहे

कानवटे संजीवनी शिवाजी या नावाची स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद येथील १२ वी वाणिज्य पास ची टी. सी. शिरूर ते बोडका या प्रवासादरम्यान दि १२ डिसेंबर २०२३ रोजी हरवली आहे. सदरील टी. सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क करावा.

मो. ७४९९७४९६५०

## जाहीरनामा

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अहमदपूर यांचे कार्यालय (दंडनीय / जन्म-मृत्यू विभाग)

कोर्टाचा शिक्का

जा.क्र. २०२४/दंडनीय/कावि

दिनांक ३.०८.२०२४

**जन्म नोंदणी प्रमाणपत्र**

**विषय:** जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९च्या कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि या न्यायालयात अर्जदार गोरगिळे विश्वनाथ त्र्यंबकराव रा. उमरगा (कोर्ट) ता. अहमदपूर जि. लातूर यांनी कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदारांचे नाव गोरगिळे विश्वनाथ त्र्यंबकराव जन्म दि ०५.०५.१९८६ उमरगा (कोर्ट). येथे राहत्या घरी ता. अहमदपूर येथे झाला असल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदणी ग्राम पंचायत कार्यालय, उमरगा (कोर्ट) ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म/मृत्यू तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात, सदर कालावधी मध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादर न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये योग्य तो आदेश पारील करील. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार अहमदपूर**

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि.१३/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार अण्णाराव श्रीपती खांडके रा. आनंद नगर, लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन लातूर जिल्हयातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी प्लॉटचे विद्यमान मालक १) नसरीन बेगम सलीम पठाण २) सोहेल फेरोज पठाण दोघे रा. माताजी नगर, लातूर यांच्या खरेदी व मालकी कब्जे वहिवाटीचा प्लॉट ज्याचा खरेदीखत दस्त डेबुक नं. ५२४३/२०२४, दि. ३०/०५/२०२४ ईसवी अन्वये मौ. सारोळा ता. जि. लातूर जमीन गट नं. १७१ पैकीचा याचा एन.ए.नं. २००६/जेएमबी/लातूर/सीआर-९११, दि. १८/१२/२००६ ईसवी अन्वये मे. सबडिव्हीजनल ऑफीस, लातूर यांनी मंजुर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. २३ चा पश्चिम भाग विक्री करत असून याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १९८१ याचे विक्री क्षेत्र लांबी दक्षिण उत्तर ५० फुट व रुंदी पूर्व पश्चिम १५ फुट याचे विक्री एकूण क्षेत्रफळ ७५० चौ. फुट जागा याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस-सदरील प्लॉटचा उर्वरित भाग
पश्चिमेस-प्लॉट नं.१७
दक्षिणेस-प्लॉट नं. २२
उत्तरेस-२० फुट रुंदीचा रस्ता

येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील प्लॉटचे विद्यमान मालक १) नसरीन बेगम सलीम पठाण २) सोहेल फेरोज पठाण दोघे रा. माताजी नगर, लातूर यांनी सदर प्लॉट माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन, ठरावापोटी कांही रक्कम इसार म्हणुन स्विकारली आहे. तरी सदर प्लॉटबाबत कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झालेपासुन सात (७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर दाखल करावा. मुदतीमध्ये जर कोणाचा आक्षेप नाही आल्यास सदर प्लॉट हा निवेध व निजोखीम आहे असे गृहित धरुन माझे पक्षकार सदर प्लॉटचे रजिस्टर्ड खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारे उजर / आक्षेप माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक: ०६/०८/२०२४

सबब हे जाहीर प्रगटन,
तर्फे -
Adv. P. V. Kalure
Netary Govt. of India
Latur Dist.Latur
Mob. No.98810 54275

जाहिर प्रगटन देणार
अण्णाराव श्रीपती खांडके
रा. आनंद नगर, लातूर
मोबा-८४८४०६०३३३


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, 0.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवींवर नियम व अटी लागू.





# यशवंत
रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४
# उदगीर
पान ५
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## अ.भा नाट्यपरिषद उदगीरशाखेच्यावतीने आयोजित प्रा. दीपक देशपांडे यांच्या हास्यकल्लोळ नी उदगीरकर मंत्रमुग्ध




**उदगीर (प्रतिनिधी)** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा उदगीर तर्फे सोला-पूर येथील प्रसिद्ध हास्य कलाकार प्रा. दीपक देशपांडे यांचा हास्यकल्लोळ हा एकपात्री प्रयोग ने उदगीरकरांना मंत्रमुग्ध केले.

. १६ ऑगस्ट २०२४ रोजी उदगीर येथील शुभंकर मंगल कार्यालयात प्रा.दीपक देशपांडे यांचा हास्यकल्होळ एकपात्री प्रयोग थाटात संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरचे अध्यक्ष प्रकाशजी यलगुलवार तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील प्रसिद्ध बासरी वादक शशिकांतजी चिंचोरे, महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे , अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा उदगीरचे अध्यक्ष बसवर-ाज पाटील नागराळकर, ब्लड बँकेचे अध्यक्ष रमेशअण्णा अंबरखाने व इतर मान्यवर हे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांनी नाट्य परिषदेच्या शाखेला शुभेच्छा देऊन, शाखेची अभिवृद्धी होण्यासाठी मी सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाखेचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर म्हणाले, ही नाट्य परिषदेची शाखा पूढे घेऊन जाण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. उदगीर येथील तरुणांना आपण सम ृद्ध बनवण्यासाठी या शाखेच्या माध्यम ातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आ-हेत.

अध्यक्षिय समारोपात प्रकाशजी यलगुलवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, सर्वप्रथम मी या शाखेच्या विकासासाठी शुभेच्छा देतो. नागराळकर यांनी उदयगिरी कॉलेजच्या स्टेजवर विदयार्थी असताना ४० वर्षा पूर्वी सादर केलेल्या नाट्य अविष्कारातील एक संवाद त्याच जोश पूर्ण उत्साहात, तितक्याच दमदार पद्धतीने त्यांनी उदगीर येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या निमित्ताने सर्व नाट्य प्रेमी रसिकांना व उदगीर कारांना अनमोल अशी मेजवानीच दिली.

प्रसिद्ध हास्य कलाकार प्रा. दीपक देशपांडे यांनी हास्यकल्लोळ या एकपात्री प्रयोगातून नाट्य रसिकांना मंत्रमुग्ध करुन टाकले.

प्रसिद्ध बासरी वादक शशिकांतजी चिंचोरे यांनी उत्कृष्ट बासरी वादन करुन श्रोत्यांची दाद मि ळवली.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला, यात सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी निवर्गी, ज्योती डोळे, सुनंदा सरदार, वर्षा म ुस्कावाड, अंबिका पार-सेवार, हर्षदा भारती, प्रगती संगोळगे यांनी केले तर आभार शाख-ेचे कार्यवाह डॉ गौरव जेवळीकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालाजी मुस्कावाड, नागेश पंगू, डॉ. संजय कुलकर्णी, अमित आग्रे, सुनील म हिंद्रकर व इतर मान्यवर यांनी सहकार्य केले.

## स्त्री मुक्तीचे प्रणेते महात्मा बसवेश्वर : शि.भ.प. अनिता हैबतपुरे




**उदगीर (प्रतिनिधी)** स्त्री मुक्तीसाठी महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात उभारलेल्या लढ्यामुळेच आज स्त्री ही सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत आहे. त्याचप्रमाणे त्यांनी समाजातील जातीव्यवस्था मोडून काढण्यासाठीचे केलेले कार्य अतुलनीय असल्याचे प्रतिपादन शि.भ.प. अनिता हैबतपुरे यांनी केले.

उदगीर वीरशैव समाजाच्या वतीने धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या ८५ वा स्मृतिदिनानिमित्त आयोजित ९० वा वचन सप्ताहात शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी दुसरे पुष्प गुंफण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. स्वाती पाटील होत्या. यावेळी विचारपीठावर वीरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापूरे उपस्थित होते.

प्रारंभी महात्म ा बसवेश्वर व धर्मवीर संग्रामप्पा शेटकार यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आप-ले विचार व्यक्त करताना अनिता हैबतपुरे यांनी,

महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये विचार स्वातंत्र्य व आपले मत व्यक्त करण्यासाठी विविध जातीतील शरण-शरणींना एकत्र जमवून अनुभव मंडपाची स्थापना केली. त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची बीजे रोवली.

अनुभव म ंडपाच्या माध्यमातून ७७० शरणांनी निर्माण केलेल्या वचनसाहित्यांचे मानवी जीवनात अनुकरण केल्यास जीवन समृद्ध होईल असे सांगून महिलांनी स्त्री स्वातंत्र्याचा दुरुपयोग न होवू देता समाजहित डोळ्यासम ोर ठेवून म. बसवेश्वर यांनी घालून दिलेल्या मार्गावरून मार्गक्रमण करावे असे सांगितले. अध्यक्षीय सम ारोपात डॉ. स्वाती पाटील यांनी, अनुभव मंडपाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता प्रथमतः महात्मा बसवेश्वरांनी आणली. त्यामुळे स्त्री-पुरुष हे समान आहेत. दोघांचं महत्त्व तितकेच असल्याचे सांगून स्त्री आरोग्यासंबंधी बोलताना त्यांनी स्त्रियांनी आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज असून उरलेलं शिळे अन्न किंवा बाजारातील फ्फास्टफ फूड खाण्याचे टाळावे, जास्तीचे उपव-ास टाळावे, ताजे अन्न खाल्यास ती सदृढ राहील असे सांगितले.

प्रास्ताविक अँड. महेश मळगे यांनी केले. सुत्रसंचालन उत्तरा कलबुर्गे यांनी केले. आभार रविंद्र हसरगुंडे यांनी मानले. कार्यक्रमास समाजबांधव उपस्थित होते.

## महिला डॉक्टरांवरील अत्याचार व हत्येच्या निषेधार्थ उदगीर डॉक्टर असोसिएशनचा निषेध मोर्चा




**उदगीर (प्रतिनिधी)** पश्चिम बंगालम धील वैद्यकीय म हाविद्यालयातील महिला सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ उदगीर डॉक्टर असोसियशनच्या वतीने निषेध मोर्चा काढून उपजिल्हाधिकारी यांना नेवेदन देण्यात आले.

या क्रुर घटनेमुळे देशभरातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन (खचअ) आणि आयुर्वेदाची नॅशनल मेडिकल असोसिएशन ( छ ख च अ ), इंडिया डेंटल असोसिएशन, ऑल इंडिया होमिओपॅथी असोसिएशन, युनानी असोसिएशन, नर्सेस आणि पॅथॉलॉजिस्ट असोसिएशन यासारख्या इतर पॅथींच्या संघटनांनी या घृणास्पद कृत्याचा निषेध केला आहे. या सर्व संघटनांच्या सदस्यांनी शनिवारी दिवसभर ओपीडी बंद ठेवून या घटनेचा निषेध केला. उदगीरमध्येही उदगीर डॉक्टर्स असोसिएशन (णऊअ) ज्यात सर्व पॅथीच्या डॉक्टरांचा समावेश आहे, यांनी आपत्कालीन सेवा वगळता दिवसभर ओपीडी बंद ठेवून आंदोलन केले. बंदमुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत असून ते एका दवाखान्यातून दुस□्या दवाखान्यात भटकत होते मात्र त्यांना वैद्यकीय सेवा मिळू शकली नाही. दुपारी सर्व डॉक्टर छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले आणि आयटीआय कॉलेज कॅम्पसमधील उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे मोर्चा वळवला. त्यांनी कोलकाता डॉक्टरांवर सामूहिक बलात्कार आणि हत्येमध्ये सहभागी असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन उप जिलहाधिकारी सुशांत शिंदे यांना सुपूर्द केले. पश्चिम बंगाल सरकार आणि केंद्र सरकारने या घटनेची लवकरात लवकर सीबीआय मार्फत चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यांनी मआम्हाला न्याय हवाफ अशा घोषणा दिल्या. त्यांनी मभारत माता की जयफ, मवंदे मातरम मचा नारा दिला. माध्यम ांशी संवाद साधताना संतप्त झालेल्या आयएम ए उदगीरचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील म्हणाले, ङ्गसंबंधित राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन मृत डॉक्टरांना लवकरात लवकर न्याय द्यावा. दोषींवर कठोर कारवाई झाल्यास मग अशाच घटना देशाच्या इतर भागातही घडत राहतील, तणावाच्या वातावरणात डॉक्टर वैद्यकीय सेवा कशी देऊ शकतात?, ङ्गनिमा उदगीरचे अध्यक्ष डॉ. राजकुमार घोन-शी कर म्हणाले ,ङ्घ पीडित महिला डॉक्टर ला लवकर न्याय नाही मिळाला तर आम्ही बेमुदत संपावर जाऊ. लोक आपल्या गरजे नुसार डॉक्टर ची सेवा घेतात. पेशंट सिरीयस असला की सेवा घेतात पण बर वाईट काही झाले की डॉक्टर वर हल्ला करतात. या साठी डॉक्टर संरक्षण कायदा लवकरात लवकर लागू करण्यात यावा. आयएमएचे डॉक्टर बाळासाहेब पाटील, डॉ महेश जाधव, डॉ रमण रेड्डी, डॉ सचिन बनगे, डॉ दीपक जगताप, डॉ सुनील माने, डॉ स्व-ाती पाटील, डॉ सौ बंगे, डॉ सुलोचना येरोळकर, निमाचे डॉ राजकुमार घोणशीकर, डॉ प्रवीण देशमुख, डॉ प्रवीण देशमुख, डॉ. ,डॉ संजय सांडोळकर, डॉ जगदीश मद्देवाड, डॉ सुनील बनशेळकीकर, डॉ दत्ता पाटील (बाहेती), डॉराम ेश्वर जाधव, होमिओपॅथ डॉ चंद्रकांत कोठारे, डॉ बुभणे, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सत्यवान बोरोळकर, धन्वंतरी मेडिकल कॉलेजचे डॉक्टर व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## बामणी ग्रा.प.चे सरपंच सौ. प्रभावती बिराजदार यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** जिल्ह्यात सर्वाधिक वृक्षारोपण व संवर्धन केलेली ग्रामपंचायत बामणी चे सरपंच सौ प्रभावती राजकुमार बिराजदार व ग्रामसेवक संजीव गुरमे यांना प्रशस्तीपत्र देऊन ना बनसोडे यांच्या हस्ते व श्रीमती वर्षा ठाकूर जिल्हाधिकारी माननीय मुंडे पोलीस अधीक्षक माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर , बाबासाहेब मनोहरे आयुक्त मनपा लातूर म ाननीय दत्तात्रय गिरी उपमुख्य कार्यकारी अधिकारी लातूर यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला ग्रामपंचायत बामणी तालुका उदगीर तर्फे सतत प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येते व चालू वर्षी सुद्धा ग्रामपंचायत तर्फे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून व वृक्षांचे संवर्धन केले आहे व वृक्ष संवर्धनासाठी गावांमध्ये कुऱ्हाड बंदी करून चांगल्या प्रकारे जतन व संगोपन करून पंचावन्न हजार वृक्ष गायरान व गावठाण जमिनीम ध्ये हनुमंत देवराई शिवानंदन वन पर्यटन स्थळ व बुद्ध गार्डन व गावातील ओपन स्पेस स्मशानभूमी व स्थानक या ठिकाणी वृक्षारोपण केले आहे या कार्याची दखल घेऊन माननीय अनमोल सागर साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर श्री दत्तात्रय गिरी साहेब यांनी माननीय नाम दार संजय भाऊ बनसोडे साहेब क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते व जिल्हा अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे मॅडम पोलीस अधीक्षक सोमय मुंडे साहेब आयुक्त म नपा श्री बाबासाहेब मनोहारे यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला याबद्दल गावचे उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यातर्फे हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## रॅगिंगला समर्थन समाजाला घातक - पो.उप निरीक्षक गणेश कदम

**उदगीर (प्रतिनिधी)** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो-लीस उपनिरीक्षक गणेश कदम यांनी मरॅगिंग विरोधी कायदे व नियमफ या विषयांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कदम यांनी रॅगिंगच्या गंभीर परिणामांवर प्रकाश टाकला आणि कायद्याचे महत्त्व स्पष्ट केले. कदम यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, ङ्गरॅगिंग हा गंभीर गुन्हा आहे आणि त्यावर कठोर कारवाई केली जाते. कोणत्याही प्रकारच्या रॅगिंगला समर्थन देणे किंवा त्यात सामील होणे हे शाळा, महाविद्यालये आणि सम ाजासाठी अत्यंत घातक आहे. रॅगिंगम ुळे अनेक विद्यार्थी मानसिक तणा-वात येतात, त्यांचं शैक्षणिक जीवन बिघडतं, तसेच सामाजिक आयुष्यात देखील नकारात्मक परिणाम होऊ शकतो.ङ्घ तसेच सर्व विद्यार्थ्यांना सूचना केली जर कोणी रॅगिंगला सामोरे जात असेल किंवा रॅगिंगचे साक्षीदार असेल, तर त्यांनी त्वरित पोलीस किंवा महाविद्यालय प्रशास-नाशी संपर्क साधावा. ङ्गआपल्या सुरक्षेसाठी आणि आनंदी शैक्षणिक वातावरणासाठी रॅगिंगविरोधी कायदे खूप महत्त्वाचे आहेत, आणि त्याचं पालन प्रत्येक विद्यार्थ्याने करावं,ङ्घ असे ते म्हणाले. या अनुषंगाने अँटी रॅगिंग विषयावर पोस्टर स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले. प्रथम बक्षीस झिंके साक्षी, द्वितीय स्वामी विद्यालक्ष्म ी, तृतीय कवटाळे उत्तेजनार्थ मलिदे वैष्णवी देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.म स्के यांनी भारतीय संस्कृती चे संस्कार आपल्याला एकमेकांना आदर देण-ारा आहे त्यामुळे रॅगिंग हा आपल्या संस्कृतीला न पटणारे आहे. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, प्रा.डॉ.एस.एन.लांडगे, प्रा.डॉ.बी.एस.होकरणे उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.एम.बी.स्वामी यांनी आभार प्रा.डॉ.एस.एन.लांडगे यांनी मानले.

**उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**मराठवाडा अर्बन बॅक्स को. ऑप. असोसिएशन लि. छत्रपती संभाजीनगर**
**अर्बन बँक भवन, प्लॉट नं. २७ विकासपुरी, चिनार गार्डन जवळ, पडेगाव छत्रपती संभाजीनगर-४३१००२**

**: जाहीर नोटस :**
**अर्जदान बँक : सहयोग अर्बन को. ऑप. बँक लि. उदगीर**
**विरुध्द**
**जाब देणार**

**शाखा: नांदेड**

| अ.क्र | दाव क्र | कर्जदाराचे नाव | | जमीनदाराचे नाव | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ४०४/२०२४-२०२५ | भारती इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स,<br>प्रो. प्रा. श्री. विरोचन प्रल्हाद भारती<br>पत्ता - शारदा नगर, समिन्त्र नगर जवळ, आनंद नगर रोड, नांदेड तरोड (बु) जि.नांदेड ४१३६०५ | ०१ | श्री. प्रमोद माधवराव देशमुख,<br>पत्ता :- घर नंबर ७४८ काळेश्वर रोड, नृसिंह मंदिर जवळ, खालची गल्ली, विष्णुपुरी, नांदेड ४३१६०६ | १३,९६,९३९/- |
| | | | ०२ | श्री. सरजीतसिंघ प्रतापसिंघ ढिल्लो,<br>पत्ता - ३-३-३४१, बडपुरा रोड, हनुमान मंदिर जवळ, गुरुद्रवार गेट नंबर ३ नांदड ४३१६०१ | |
| ०२ | ४०५/२०२४-२०२५ | श्री. हाळे आप्पाराव संभाजी,<br>पत्ता- मु.पो. मनुर<br>ता.उमरी जि.नांदेड ४३१८०७ | ०१ | श्री. सुत्रावे प्रकाश गंगाधराव ,<br>पत्ता : करखेली रोड, मसाई मंदिर जवळ, मु.पो. करखेली, ता. धर्माबाद जि.नांदेड ४३१८०८, | १५,०२,४७९/- |
| | | | ०२ | श्री. बिजे दिपक मसनाजी,<br>पत्ता : निवासी मतिमंद विद्यालय, धर्माबाद,<br>ता.धर्माबाद, जि. नांदेड ४३१८०९ | |
| ०३ | ५५८/२०२४-२०२५ | मे. हॉटेल श्री. बार अॅन्ड रेस्टॉरंट,<br>प्रो.प्रा. श्री. व्यंकट पुंडलिक लोहकरे,<br>पत्ता :- तोगरी फाटा, देवणी ता. देवणी जि.लातूर<br>सहकर्जदार : पार्वतीबाई व्यंकट लोहकरे,<br>पत्ता : निडेबन वेस, उदगीर ता. उदगीर जि.लातूर | ०१ | श्री. शेख अजिम शेख सलीम,<br>पत्ता:- चर्च रोड, डि.एड. कॉलेज जवळ, उदगीर | ४७,७५,९३२/- |
| | | | ०२ | श्री. दहिकांबळे दत्ता संतराम,<br>पत्ता :- अशोक नगर, जळकोट रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | |
| ०४ | ५५९/२०२४-२०२५ | पतंगे अभिलाष चंद्रकांत,<br>पत्ता :- मु.पो. देवणी (बु.)<br>ता.देवणी जि.लातूर | ०१ | श्री. पतंगे देविदास राजाराम,<br>पत्ता : पंचायत समिती समोर, देवणी (बु)<br>ता.देवणी जि.लातूर | ३,१३,५०७/- |
| | | | ०२ | श्री. उटवाले दाउदमियाँ मुनिरसाब,<br>पत्ता. गौंडी गल्ली, देवणी (बु)<br>ता.देवणी जि.लातूर | |
| | | **शाखा :- लातूर** | | | |
| ०५ | ५६०/२०२४-२०२५ | श्री. धनाजी रामराव करकुले,<br>मु.पो. धवेली,<br>ता.रेणापुर, जि.लातूर<br>पिन. ४१३५२२ | ०१ | श्री. रामराव ज्ञानोबा करकुले<br>मु.पो. धवेली,<br>ता.रेणापुर, जि.लातूर<br>पिन. ४१३५२२ | १,५५,८३२/- |
| | | | ०२ | श्री. संभाजी शिवाजीराव काळे<br>रा. सराफ लाईन, लातूर<br>पिन ४१३५१२ | |
| | | | ०३ | श्री. माधव भिमराव काळे,<br>रा. महाराणा प्रताप नगर, लातूर<br>ता.जि. लातूर<br>पिंन ४१३५१२ | |
| ०६ | ५६१/२०२४-२०२५ | श्री. राहुल हरिशचंद्र माने<br>मु.पो. दस्तगिरवाडी<br>ता.अंबाजोगाई जि. बीड<br>पिन. ४३१५१७ | ०१ | श्री. अनंत रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ४,०२,०२१/- |
| | | | ०२ | श्री. उमाकांत वसंतराव दिक्षीत<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| ०७ | ५६२/२०२४ २०२४ | श्री. अनंत रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ०१ | श्री. नानासाहेब श्रीरंगराव शेळके<br>मु.पो. हातोला. ता. अंबाजोगाई<br>जि.बिड पिन ४३१५१७ | १०,५३,११८/- |
| | | | ०२ | श्री. शिवाजी सुर्यभान डोईफोड<br>मु.पो. कुबेफळ ता. अंबाजोई जि.बिड<br>पिनं ४३१५१७ | |
| ०८ | ५६३/२०२४-२०२४ | श्री. दत्ता राजाभाउ भोसले<br>मु.पो. कुबेफळ ता. अंबाजोई<br>जि.बिड<br>पिनं ४३१५१७ | ०१ | श्री. अनंत रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ४,५०,५२९/- |
| | | | ०२ | श्री. कल्याण रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| ०९ | ५६४/२०२४-२०२४ | श्री. अक्षय अशोक भासले<br>मु.पो. कुबेफळ ता. अंबाजोई<br>जि.बिड<br>पिनं ४३१५१७ | ०१ | श्री. अनंत रामचंद्र भासले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ४,६०,५७१/- |
| | | | ०२ | श्री. कल्याण रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| १० | ५६५/२०२४-२०२४ | श्री. सुषमा कल्याण भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी, पोखरी रोड ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ०१ | अनंत रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी, पोखरी रोड ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ४,३२,७३४/- |
| | | | ०२ | श्री. कल्याण रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी , पोखरी रोड ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| ११ | ५६६/२०२४-२०२४ | सौ. ज्ञानेश्वरी अनंत भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी, ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | ०१ | सतिश हरिभाउ भासले<br>मु.पो. कुंभोफळ ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | २०,६०,४३५/- |
| | | | ०२ | श्री. अनंत रामचंद्र भोसले<br>मु.पो. जोबाईवाडी , ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| १२ | ५६७/२०२४-२०२४ | मे. इंद्रायणी सिड्स अॅड अॅग्रो टेक प्रा. लि.<br>भागीदार १) कल्याण रामचंद्र भासेले<br>२) सतिश हरिभाउ भोसले<br>पत्ताः प्लॉट नं. एफ-९३<br>एमआयडीसी लातूर ता.जि.लातूर<br>पिन ४१३५१२ | ०१ | श्री. अनंत विष्णुपंत टेमकर<br>मु.वरपगाव पो. लोखंडी सावरगाव<br>ता.अंबाजोगाई जि.बिड<br>पिन. ४३१७१५ | १५,७६,०८२/- |
| | | | ०२ | अनंत पंढरीनाथ मुळे<br>मु.पो. जोबाईवाडी , ता. अंबाजोगाई<br>जि. बिड पिन ४३१५१७ | |
| | | | ०३ | कुमदिनी मुरलीधर देशपांडे<br>रा. श्रीनगर सोसायटी, अंबाजोगाई<br>ता.अंबाजोगाई जि. बिड<br>पिन ४३१७१५ | |
| १३ | ५६८/२०२४-२०२४ | श्री. सुमित सुरेश मित्तल<br>मे. मित्तल प्लाय अॅड हार्डवेअर<br>मोती नगर लातूर<br>ता.जि.लातूर ४१३५१२ | ०१ | श्री. प्रसाद जगन्नाथ राठी<br>पत्ता : बालाजी मंदिरजवळ<br>पापविनाश रोड, लातूर ता.जि.लातूर ४१३५१२ | ३९,६०,३४४/- |
| | | | ०२ | श्री. सतिश नागोराव श्रीमंगले<br>पत्ता. कावेरी निवास, सिव्हील हॉस्पीटल कॉर्टर लातूर ता.जि.लातूर ४१३५१२ | |
| १४ | ५६९/२०२४-२०२४ | मे. अनंत टेडर्स<br>श्री. अमित श्रीनिवास नाईक<br>पत्ताः नाईक निवास गंजगोलाई लातूर जि.लातूर ४१३५१२ | ०१ | श्रीनिवास अनंतराव नाईक<br>पत्ताः नाईक निवास गंजगोलाई लातूर जि.लातूर ४१३५१२ | ५४,७१,७६३/- |
| | | | ०२ | श्री. सतिश नागोराव श्रीमंगले<br>पत्ता. कावेरी निवास, सिव्हील हॉस्पीटल कॉर्टर लातूर ता.जि.लातूर ४१३५१२ | |
| | | | ०३ | श्री. प्रयाग दिपक विश्वनाथ<br>गंजगोलाई पुर्व बाजु लातूर जि.लातूर ४१३५१२ | |
| | | | ०४ | श्री. प्रल्हाद जगन्नाथ राठी<br>पत्ता : बालाजी मंदिरजवळ<br>पापविनाश रोड लातूर ४१३५१२ | |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिवादींना अर्जातील रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादींना समन्स रुजु न झाल्याने व त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक ०४/०९/२०२४ रोजी दुपारी ११.३० वाजता दाव्यसंबंधी कागदपत्रासह आपण यवा न्यायालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहरजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी त्याचप्रमाणे वरील तारखेस अगत तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणुन आज दिनांक १६/०८/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

सुनावणीचे ठिकाण :
उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा )
मराठवाडा अर्बन बॅक्स को. ऑप. असोसिएशन लि. अर्बन बँक
भवन प्लॉट. २७ विकासपुरी,
चिनार गार्डन जवळ, पडेगाव छत्रपती संभाजीनगर-४३१००२

उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा )
मराठवाडा अर्बन बॅक्स को. ऑप.
असोसिएशन लि. छत्रपती संभाजीनगर

---

सहयोग अर्बन को. ऑप बँक लि. उदगीर मुख्य कार्यालय :- शास्त्री कॉलनी, नवी आबादी, नगर परीषदेच्या पाठीमागे, नदिड बिदर रोड, उदगीर
वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (केवळ सभासदांसाठी)
(सन २०२३-२०२४)

बँकेच्या सभासदांची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०३.०९,२०२४ वार मंगळवार रोजी ठीक सा. ५.३० वाजता सहयोग अर्बन को.ऑप बैंक ली. उदगीर, प्रधान कार्यालय, शास्त्री नगर, नवी आबादी, नगर परीषदेच्या पाठीमागे, उदगीर येथे बँकेचे अध्यक्ष मा.श्री. रमेश नागप्पा अंबरखाने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे तरी या सभेस आपण वेळेवर उपस्थित राहावे अशी विनंती,
**१)** दिनांक २६.०९.२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वातून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल व दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरचा ताळेबंद व २०२३-२४ वे नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे **३)** मा. वैधानिक लेखापरिक्षक में बी.डी.एस.पी. अॅन्ड असोसीएट्स, यांच्याकडून प्राप्त झालेल्या वर्ष २०२३-२४ च्या वैधानीक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे व स्वीकृत करणे **४)** आर्थिक वर्षे २०२२-२०२३ च्या वैद्यानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरूस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे व स्वीकृत करणे. **५)** मा. संचालक मंडळाने शिफ्फ़ारस केलेला वर्ष २०२३-२४ च्या नफ्फ़ा विभागणीची नोंद घेणे व त्यास मंजूरी देणे **६)** आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्वास व २०२४-२५ वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे. **७)** आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी मा. संचालक मंडळाने अंतर्गत लेखापरीक्षकांच्या केलेल्या नियुक्तीस व मेहनतान्यास मान्यता देणे व वर्ष २०२५-२६ साठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याचे व मानधन ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे **८)** आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता मा वैधानीक लेखापरीक्षकांची रिझर्व बँकेच्या पूर्व मान्यतेने नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे. **९)** विद्यमान पोटनियमामध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस मान्यता देणे. **१०)** मा. संचालक मंडळाने शिफ्फ़ारस केलेल्या व मा. वैधानीक लेखापरीक्षकांनी प्रमाणीत केलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसूलीचे सर्व हक्क अबाधीत ठेवून निरस्त करणे व तडजोडीने बंद केलेल्या कर्ज प्रकरणास मंजूरी देणे **११)** २५ व्या सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे. **१२)** मा. अध्ययाचि पूर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

**विशेष सुचना**

गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा, त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. तहकुब सभेस गणसंख्यापूर्वीची ऑवश्यकता असणार नाही.

स्थळ : उदगीर १८.०८.२०२४

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
नारायण नागेश डोळे
मुख्य कार्यकारी अधिकारी

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतील विषयासंबधीची आवश्यक ती कागदपत्रे व माहिती पहावयाची असल्यास ती बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) पहावयास मिळतील. २. ज्या सभासदांना विषयासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न लेखी स्वरूपात सभेच्या अगोदर सात दिवस बँकेच्या मुख्य कार्यालयात सादर करावेत. मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांची दखल घेतली जाणार नाही. ३. वार्षिक अहवालाची प्रत नजिकच्या शाखेच्या कामकाजाच्या वेळेत उपलब्ध राहील, सभेस येताना कृपया अहवाल सोबत आणावा. ही विनंती ४. सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास, नाव, पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक बँकेस त्वरित कळवावा. तसेच शेअर्ससाठी आपल्या वारसाची नोंद केली नसल्यास, ती त्वरित करावी तसेच अद्ययावत केवायसी (केवायसी डॉक्यमेंटस्) बँकेकडे सादर करावेत, **: सभासद प्रशिक्षण कार्यक्रम :-** दिनांक :- ०३.०९.२०२४ रोजी वार्षिक सभेच्या ठिकाणी दुपारी ठीक ४.३० वाजता सभासदचि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजि केला असून आपण सर्व सभासदांनी यासाठी अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जळकोट यांचे कार्यालय**
(दंडणीय- विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१३/०८/२०२४

**जाहिरनामा**

ज्याअर्थी अर्जदार सोनकांबळे पंकज बळीराम वय ४० वर्ष रा. धामणगाव ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे धामणगाव ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०१/०१/१९८४ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील सोनकांबळे पंकज बळीराम यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९८४ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार सोनकांबळे पंकज बळीराम यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९८४ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार सोनकांबळे पंकज बळीराम यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९८४ रोजीची नोंद ग्रामपंचायत धामणगाव ता. जळकोट येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १३/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख १४/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार जळकोट

# अमानवीय घटनेच्या निषेधार्थ कँडल मार्च

लातूर : कोलकात्यातील अमानवीय घटनेच्या निषेधार्थ आयएमए, निमा, होमिओपॅथी, आयडीए, मार्ड व नर्सिंग स्टाफ या संघटनांच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी लातुरात कँडल मार्च काढण्यात आला. या कँडल मार्चमध्ये मोठ्या संख्येने तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. शनिवारी सर्व दवाखाने बंद ठेवून या प्रकरणातील आरोपीना फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. सर्व वैद्यकीय संघटनांच्या वतीने शनिवार अत्यावश्यक सेवा वगळता वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार हे आंदोलन करण्यात आले.



कोलकात्यातील वैद्यकीयमहाविद्यालयातपदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या एका महिला डॉक्टरवर अमानुष बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची अमानवीय घटना घडली आहे. या घटनेने संपूर्ण देश ढवळून निघाला असून आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टर्स व नर्सिंग स्टाफच्या सुरक्षेचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या निंदनीय घटनेचा निषेध करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी लातूरच्या गांधी चौकातील शासकीय सुपरस्पेशालिटी रुग्णालयापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत व तेथून परत रुग्णालयापर्यंत हा कँडल मार्च काढण्यात आला. या कँडल मार्चमध्ये लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्यासह आयएएमचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, सचिव गणेश बंदखडके, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. गिरीश कोरे, डॉ. अभय कदम, डॉ. संगमेश चवंडा, डॉ. अजय ओव्हाळ , डॉ. शैलेंद्र चव्हाण, डॉ. उमेश लाड, डॉ. विमल होळंबे, डॉ. क्रांती साबदे , डॉ. सुरेखा काळे, डॉ. शांता कानडे, डॉ.अनुजा कुलकर्णी, डॉ. मोहिनी गानू, डॉ. शुभांगी राऊत, डॉ.शैला सोमाणी, डॉ. ऋजुता अयाचित, डॉ.सचिन इंगळे, डॉ. नरेंद्र पाटील, डॉ. रमेश भराटे, डॉ. महेश सावंत, डॉ. सचिन जाधव यांच्यासह शहरातील अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते. वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच पदव्युत्तर शिक्षण घेणारे डॉक्टरशी सहभागी झाले होते. यावेळी कँडल मार्चमध्ये सहभागी झालेल्या सर्व डॉक्टर्सनी कोलकात्यात घडलेल्या या अमानुष प्रकरणाची उच्च स्तरिया चौकशी व्हावी व फास्ट ट्रॅक कोर्टात हा खटला चालवून आरोपीना तात्काळ कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली. विशेष करून महिला डॉक्टरांच्या सुरक्षेची काळजी, इमर्जंसी वॉर्डला सेवा देणाऱ्या डॉक्टरांना सुरक्षा देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. डॉ. उमेश कानडे, डॉ. गणेश बंदखडके यांनीही घडल्या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध केला.

कँडल मार्चमध्ये आपले विचार व्यक्त करताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून आपण संसदेतही हा विषय उपस्थित करून याप्रकरणी फस्त ट्रॅक कोर्टात खटला चालविण्याची मागणी लावून धरू असे सांगितले. त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांवर भ्याड हल्ले होणे, अशा अमानवीय घटना घडणार नाहीत यासाठीची उपाय योजना करण्यासाठीही आपण सर्वतोपरी उपाययोजना करू असे त्यांनी सांगितले.

डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनीही या प्रकरणाचा तीव्र शब्दात निषेध केला. या कँडल मार्च व राष्ट्रव्यापी बंद मध्ये आयएमए लातूर, एम.एस.एम.टी. लातूर, मार्ड लातूर, मॅग्मो लातूर, एमसीएमओ लातूर, वैद्यकीय विद्यार्थी संघटना, नर्सिंग संघटना, पॅरा मेडिकल असोसिएशन यासह डॉक्टर्स संघटनांनी कँडल मार्चमध्ये सहभाग घेतला. शनिवारच्या राष्ट्रव्यापी दवाखाने बंद ठेवण्याच्या आवाहनास सर्वच तज्ज्ञ डॉक्टरांनी प्रतिसाद देऊन अत्यावश्यक सेवा वगळता रुग्णसेवा बंद ठेवली.

# महायुतीच्या योजनांचे श्रेय लाटणे बंद करा विकास कामाच्या चर्चेसाठी जनतेसमोर या

## भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड यांचे काँग्रेस आमदारांना अवाहन

लातूर दि. १७- केंद्र शासन आणि राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसह इतर योजनांचे आणि भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण मतदार संघात मंजूर केलेल्या विकास कामाचे श्रेय लाटण्याचा प्रकार नोटाच्या विरोधात निवडूण आलेल्या काँग्रेस आमदारांनी तात्काळ बंद करावा असे सांगून मतदार संघातील विकास कामाच्या चर्चेसाठी त्यांनी जनतेसमोर यावे असे अवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव तथा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना समितीचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष ऋषिकेश रमेशअप्पा कराड यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात पत्रकारांशी बोलताना भाजयुमोचे ऋषिकेश कराड म्हणाले की, राज्यातील महिला आणि मुली आर्थिक सक्षम आणि आत्मनिर्भर व्हाव्यात आणि त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा व्हावी यासाठी अत्यंत महत्वपुर्ण मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरु केली. या योजने अंतर्गत लातूर ग्रामीण मध्ये १ लाख १ हजार ५४५ महिला लाभार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. या पात्र महिला लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने २ महिन्याचे प्रत्येकी ३ हजार रुपये याप्रमाणे एकुण ३० कोटी ४६ लक्ष ३५ हजार रुपये बॅक खात्यात जमा करुन राखी पोर्णिमेच्या निमीत्ताने भेट देण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना महायुती शासनाने जाहीर केली



तेव्हा काँग्रेस व इतर विरोधी पक्षाच्या वतीने ही योजना फसवी आहे, निवडणूकीपुरतीच आहे असे सांगून विरोध केला. न्यायालयात गेले मात्र शासनाने गेल्या दोन दिवसापासून पात्र ठरलेल्या महिलांच्या बॅक खात्यात या योजनेचे पैसे जमा होत असतानाच विरोध करणाऱ्या काँग्रेसच्या स्थानिक आमदारांनी महिलांना अभिनंदानाचे मेसेज पाठवून महीलांची सहानुभूती आणि श्रेय लाटण्याचा केवीलवाणी प्रयत्न केला असा आरोप करुन योजनेचे माझी लाडकी बहीण असे नावच बदलून टाकले असल्याचे बोलून दाखवले.

महायुती शासनाने लाडकी बहीण योजना सुरु करुन निराधारांच्या पगारी थांबवत आहे असा आरोप एकुरगा येथील कार्यक्रमात जिल्हा बॅकेचे चेअरमन काँग्रेस आमदार महाशयाचा समाचार घेताना ऋषिकेश कराड म्हणाले की, जिल्हा बॅक शासनाच्या वतीने वेळोवेळी दिलेल्या अनुदानाची रक्कम गरजू लाभार्थ्यांना गोरगरीब जनतेला वेळेवर वाटप करत नाही. रेणापूर तालुक्यातील संगायो समितीने मंजूर केलेल्या १८ हजार ११४ पात्र लाभार्थ्यांची ७ कोटी ९८ लक्ष ९९ हजार रुपयाची रक्कम लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेकडे गेल्या २५ जुलै २०२४ रोजीच्या धनादेशाद्वारे जमा करण्यात आली आहे मात्र अद्याप सदर रकमेचे निराधार लाभार्थ्यांना अनुदान वाटप केले नाही यावरुन जिल्हा बॅकेची तत्परता दिसून येत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

रेणापूर तालुक्यातील मौजे चाडगाव येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या ग्रामपंचायत इमारत, शाळा दुरुस्ती, अंतर्गत रस्ते यासह विविध विकास कामाचा शुभारंभ दि. ०३ सप्टेंबर २०२२ रोजी गावकऱ्यांच्या साक्षीने झाला असताना या कामासह ९ ऑगस्ट २०२४ रोजी काँग्रेस आमदारांनी जागे अभावी रद्द झालेल्या सिमेंट नाला बंधाऱ्याचे भूमिपूजन केले असल्याचे प्रसिद्धी पत्र काढून श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला. गेल्या पाच वर्षात निवडून आलेल्या काँग्रेस आमदार महोदयांनी कसल्याही प्रकारच्या विकासाची कामे केली नाहीत, जनतेच्या अडीअडचणीला धावून आले नाहीत असा आरोप ऋषिकेश कराड यांनी केला.

रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील पुरातन श्री. विठ्ठल रूक्मीणी मंदिराचे जतन व्हावे, या मंदिराचा सर्वांगीन विकास व्हावा याकरीता भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पर्यटन व सांस्कृतिक कार्यमंत्री आणि पर्यटन विभाग, पुरातन विभाग यांच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन या मंदिराकरीता तब्बल ९ कोटी ३४ लक्ष ४९ हजार ९३४ रुपयाचा निधी मंजूर करुन घेतला. त्याचबरोबर लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालय बांधकामासाठी २५ कोटी ४७ लक्ष रुपये आणि मुरुड बसस्थानक परिसरातील सिमेंट कॉंक्रीट वाहनतळाकरीता २ कोटी ४८ लक्ष रुपये विशेष प्रयत्न करुन राज्यातील महायुती शासनाकडून मंजूर करुन घेतले असतानाही या तिन्ही कामासाठी काहीही प्रयत्न न करता लातूर ग्रामीणच्या निष्क्रीय कॉंग्रेस आमदार महोदयांनी वृत्तपत्रांना बातम्या देवून या कामाचे श्रेय लाटण्याचा लाजीरवाणा प्रयत्न केला आहे. या कामासाठी कोणी प्रयत्न केले, कधीपासून पाठपुरावा केला याची सर्व कागदपत्रे आपल्याकडे आहेत. भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी मंजूर केलेल्या कामाचे आम्ही हकदार आहोत याचे श्रेय कोणीही घेण्याचा प्रयत्न करु नये असेही भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड यांनी बोलून दाखविले.

# कर्म ,क्रिया,वासना,आसक्तीतून मुक्त होण्याकरता नामस्मरण सेवा हाच राजमार्ग आहे :ज्ञानराज महाराज

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- कर्म वासना क्रिया आसक्ती यातून मुक्त होण्यासाठी आणि प्रपंच चक्राचा फेरा चुकवण्यासाठी नामस्मरण सेवा हाच एक राजमार्ग आहे त्यासाठीच या गुरुपरंपरेने चक्रीभजनाची उपासना दिली आहे असे विचार ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी व्यक्त केले आहेत. औसा येथे ज्ञाथमंदिरात पिठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांची श्रावणमास अनुष्ठान सुरू आहे यात नित्य चक्रीभजना नंतर ज्ञानेश्र्वरी प्रवचनात ज्ञानराजमहाराज बोलत होते.

सेवेकरीता १८ व्या अध्यायातील ९ व्या श्र्लोकातील ओवी क्रमांक ५/६ या ओवीवर सुंदर सहज सोपे निरूपण करताना श्री ज्ञानराज महाराज माऊली यांनी आपल्या अंतकरणात जो आत्मा आहे त्याला परमात्म्याची भेट होण्याकरता भक्ती मार्ग हा सर्वश्रेष्ठ आहे जो सोपा वाटत असेल तरी व्यापक आणि कठीण आहे कारण नित्यनेम नित्य नामस्मरण आणि नित्यसेवा याला यात प्राधान्य आहे आचार विचार कर्म यावर त्याच्या फलश्रुती अवलंबून आहेत वस्तू बाबत आपण विचार करताना ती



स्वच्छ चकचकीत निर्मळ हवी असते वस्त्र देखील स्वच्छ निर्मळ आणि झगझगीत हवे असतात मग मन तसे स्वच्छ निर्मळ नको का , असा सवाल करीत महाराज म्हणाले घर अंगण गाव वस्ती प्रसाद मंदिर मठ आपला देश सारे स्वच्छ निर्मळ सुंदर आणि मंगलमय असावेत हे खरे व आवश्यक तसेच मनही स्वच्छ निर्मळ निर्विकार आणि सात्विक असणे जरुरीचे आहे तेव्हाच आपण साधनेत एकरूप होऊन गुरुचरणाशी आणि भगवंत परमात्म्याशी अनुसंधान बांधू शकू आणि ही प्रक्रिया घडली की आपोआपच आपण या मायाजाल अर्थात प्रपंच चक्रातून मुक्त होण्यास पात्र ठरतो असे श्री ज्ञानराज महाराज म्हणाले आज पुत्रदा एकादशी आहे याचे महत्त्व विशेष आहे तसे प्रत्येक एकादशीचे वेगवेगळे महात्म्या असल्याचे सांगून महीशमती राज्याच्या महिपती राजाची कथा त्यांनी अत्यंत समर्पकरीत्या सांगितली एकादशी दिवशी नियमाने उपवास करून देखील द्वादशीला तहानलेल्या एका गाईस हकल्याचा दोष त्या राजाला लागतो आणि तो पुत्रहीन राहतो जेव्हा त्या स या पुत्रदा एकादशीचे व्रत करण्याची सूचना लोमेश ऋषी हे देतात तेव्हा त्याला गतजन्मीच्या या भोगापासून मुक्तता लागून पुत्रप्राप्ती होते हा दृष्टांत यथार्थपणे कथन केला सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान मधील आद्य पुरुष विरनाथ महाराजांच्या पत्नी आणि द्वितीय सत्पुरुष मल्लाप्पा महाराजांच्या आई साध्वी तपस्वी महादामाय यांचा जन्मदिन परवा संस्थानात संपन्न झाला त्यांचे यापरंपरेतील योगदान कार्य हे खूप महान आहे असे महाराजांनी सांगितले. त्यांना जी कामना कराल ती फलद्रूप होते हा शिष्य भक्तांचा विश्र्वास असल्याचे ते म्हणाले.

# चाकूर तालुका पत्रकार मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष आचवले; सचिवपदी नितीन कुलकर्णी यांची बिनविरोध निवड

चाकुर : चाकूर तालुका पत्रकार मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी वडवळ नागनाथ येथील जेष्ट पत्रकार संतोष आचवले यांची तर सचिवपदी चापोली येथील पत्रकार नितीन कुलकर्णी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

चाकूर तालुका पत्रकार पत्रकार मित्र मंडळाच्या अध्यक्ष आणि सचिवाच्या निवडी संदर्भात गुरुवारी ( दिं.१५ ) चाकूर येथील पत्रकार मित्र मंडळाच्या कार्यालयात मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संदीप अंकलकोटे यांच्या अध्यक्षतेखाली तर संस्थापक सचिव निरंजन रेड्डी यांच्या उपस्थितीत मंडळाच्या सर्व सदस्यांची एक विशेष बैठक घेण्यात आली. याप्रसंगी पुढील दोन वर्षासाठी चाकुर तालुका पत्रकार मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी दैनिक सकाळचे वडवळ नागनाथ येथील बातमीदार संतोष आचवले



यांची तर सचिवपदी दैनिक सामनाचे चापोली येथील पत्रकार नितीन कुलकर्णी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नुतन अध्यक्ष आणि सचिवांचा श्री. संदिप अंकलकोटे आणि श्री. निरंजन रेड्डी यांनी त्यांचा शालश्रीफळ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या बैठकीस जेष्ठ पत्रकार भरतसिंह ठाकूर, ओमप्रकाश लोया, मधुकर कांबळे, संग्राम होनराव, वैभव रेकुळगे, सलीम तांबोळी, यादव करडीले, धर्मराज साबदे, नवनाथ डिगोळे, शिवशंकर होनराव, मंगेश आडे यांच्यासह चाकुर तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

उपस्थितांचे आभार नुतन अध्यक्ष संतोष आचवले यांनी मानले.

# जि. प. शाळेतील ५० हून अधिक विद्यार्थ्यांनाविषबाधा

छ. संभाजीनगर : प्रतिनिधी- छत्रपती संभाजीनगरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पैठणमधील केकत जळगाव जिल्हा परिषद शाळेमधील सुमारे ५० हून अधिक विद्यार्थ्यांना बिस्किटातून विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

बिस्किट खाल्लयानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्यांचा त्रास होऊ लागल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकारामुळे पालक संतप्त झाले आहेत.

पैठण तालुक्यातील केकत जळगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शनिवारी बिस्किट वाटप करण्यात आले होते. हे बिस्किट खाल्लयानंतर विद्यार्थ्यांचे पोट दुखू लागले. काही जणांना मळमळ, उलट्या होऊन सुमारे ५० हून अधिक विद्यार्थी तापाने फणफणल्याचे लक्षात आल्यावर या सर्व विद्यार्थ्यांना पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. काहींना सलाईन लावण्यात आले असून लहान मुले गळून गेली आहेत. सर्व मुलांवर उपचार सुरू असून या सर्व मुलांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयातील सूत्रांनी दिली आहे.

पैठणच्या केकत जळगावच्या जिल्हा परिषद शाळेत शनिवार असल्याने मुलांना बिस्किट वाटप करण्यात आले. बिस्किट खाताच विद्यार्थ्यांना त्रास होऊ लागला. पोटात दुखून मळमळ, उलट्या सुरू झाल्या. ५० हून अधिक विद्यार्थ्यांना हा त्रास झाल्याचे आढळून आले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पाचोड येथे ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले.

बिस्किटातूनच विषबाधा झाली असल्याचे उघड झाले. काही विद्यार्थ्यांना सलाईन लावण्यात आले असून काहींवर उपचार सुरू आहेत. या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले असले तरी जि. प. शाळेत ही घटना घडल्याने पालकांमध्ये नाराजी आहे.

# बलदवानगरमध्ये स्वातंत्र्यदिनी वृक्षारोपण

लातूर दि. १६ (प्रतिनिधी) : वाढते प्रदुषण व पर्यावरणाचा असमतोल याचा परिणाम मोठ्याप्रमाणात होऊ लागला आहे. त्यामुळेच वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज बनली आहे. लातूर येथील बलदवानगर येथे स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून उद्योगपती अजयकुमार बलदवा यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अष्टविनायक युवा प्रतिष्ठान व मित्र मंडळाच्या वतीने वृक्षसंवर्धनाची शपथ घेण्यात आली.

लातूर शहरात दिवसेंदिवस प्रदूषण वाढू लागलेले असून त्याचा परिणाम दिसून लागलेला आहे. विशेष म्हणजे वृक्षांची असणारी कमतरता यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. ही बाब लक्षात घेवूनच लातूर शहरात जास्तीत वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. स्वतंत्र्यदिनाचे औचित्य साधून बलदवा नगर येथे अष्टविनायक युवा प्रतिष्ठान व अष्टविनायक बचत गटाच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. याचा शुभारंभ प्रसिध्द उद्योगपती अजयकुमार बलदवा यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे रोपण केलेल्या वृक्षांचे संगोपन करण्यासाठी त्यांना संरक्षण जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. या अभियानाच्या माध्यमातून अष्टविनायक प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थित सर्वांना वृक्ष संवर्धनाची शपथही देण्यात आली.

या अभियानात माधव चिलमे, अजित देशमुख, बाबुराव बिरादार, अच्युत सोळुंके, चव्हाण, पद्माकर शेळके, सूर्यवंशी, सगरे, मुगळे, रेवण डोके, चिल्लरगे, कांबळे आदींसह परिसरातील नागरिकांनी सहभाग नोंदविला होता.

# ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या आनंदात साजरा



शेडोळ : येथील महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ७८ वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या हर्षाने आनंदाने साजरा करण्यात आला.

शाळेचे मुख्य ध्वजारोहण महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक तथा माजी प्राचार्य श्री दिलीपराव धुमाळ सर यांच्या हस्ते संपन्न करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री संजीव कदम सर उपस्थित होते.

एक पाऊल विज्ञानाकडे, एक पाऊल चंद्राकडे हा वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून विद्यालयातील इयत्ता आठवी अ मुलींच्या चमुने इस्रो ने लॉन्च केलेले चांद्रयान ३ या अवकाशयानाची हुबेहूब प्रतिकृती तयार केली.

म्हणजेच विद्यालयाच्या इस्रोच्या टीमने चांद्रयान निर्मिती करण्याचा प्रयत्न केला या प्रतिकृतीचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिक श्री विठ्ठलराव धुमाळ भाऊ ज्यांच्या हस्ते करण्यात आले. सहाय्यक शिक्षक म्हणून श्री मंदे सर यांनी मदत केली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली,त्याचबरोबर अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली.

पान १ वरून

## आमच्या....

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत मी मंत्रिमंडळात सांगितलं होतं की, रक्षाबंधनाच्या अगोदर या योजनेचे पैसे पोहोचले पाहिजेत. मात्र, हे पैसे पोहोचले की नाही ते पाहण्यासाठी काही लोक म्हणाले की, आधी एक रुपया टाकूयात. त्यांना मी म्हटलं जर एक रुपया टाकला तर विरोधक म्हणतील ३ हजार देणार म्हणाले आणि १ रुपया टाकला. त्यानंतर आम्ही ठरवलं की सर्व तीनच्या तीन हजार रुपये टाकायचे आणि योजना सुरु करायची. तेव्हापासून मी ज्या ठिकाणी कार्यक्रमाला जात आहे, त्या ठिकाणी माझ्या लाडक्या बहीणी मला पैसे आल्याचे सांगतात, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## ४ राज्यांत...

होणार आहेत. त्यामुळे राज्यात सा-यांना उत्सुकता लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नेमकी कधी होणार, हे अद्याप तरी समोर आलेले नाही. त्यामुळे याच मुद्द्याला घेऊन शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर निशाणा साधला. ते नागपूर विमानतळावर आले असता ते बोलत होते.

## बांगला...

अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आल्याने माहिती गोळा करण्यात अडचणी आल्याने मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो, अशी भीतीही संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. सरकारही रुग्णालयांना माहिती देण्यापासून रोखण्यात आले आहे. बांगलादेशात जूनमध्ये आरक्षणाविरोधात आंदोलने सुरू झाली. निदर्शनांदरम्यान सुरक्षा दलांकडून मानवाधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

अहवालात हल्ल्यांचाही उल्लेख

बांगलादेशमध्ये धार्मिक अल्पसंख्याकांच्या विरोधात लूटमार, तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनाही घडल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात म्हटले आहे. याशिवाय अवामी लीगच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांचीही सूडाच्या भावनेतून हत्या करण्यात आली. बांगला देशमध्ये वेगाने कायदा आणि सुव्यवस्था पुनर्संचयित करण्याची गरज आहे. तसेच, हिंसाचाराच्या दोषींवर जबाबदारी निश्र्चित करण्याची गरज आहे अशी अपेक्षाही या अहवालातून व्यक्त करण्यात आली आहे.

## मुरुड येथील...

कोकणदेवी सभागृह, नृसिंह मंदिर सभागृह, विविध पेवर ब्लॉक रस्ते, स्मशानभूमी रस्ता, नाली बांधकाम, वैदू हनुमान मंदिर सभागृह, भुसार बाजार पत्रा शेड उभारणी यासह विविध कामाचे भूमिपूजन करण्यात आले. मुरुड शहरातील सर्वच जिल्हा परिषद शाळेला टी. व्ही. स्क्रीन व संगणक संचाचे वितरण उत्साहाच्या वातावरणात आमदार कराड यांच्या हस्ते झाले. यावेळी महिलांनी आमदार कराड यांना राखी बांधून औक्षण केले. यावेळी सरपंच अमृता नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, वैभव सापसोड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता तांबोळी, भाजप पंचायत राज व ग्रामविकास सेलच्या प्रदेश सहसंयोजक डॉ. सरोजनी राऊत, भाजपचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, संभाजी वायाळ, सूरज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, लता भोसले, श्रुती सवई, महेश कणसे, अनंत कणसे आदींची उपस्थिती होती.

## ८४ खेळाडूंचे...

अंतिल यांचे पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ साठी भारताचे ध्वजवाहक म्हणून नामांकन करण्यात आले आहे. ते देशातील ८४ खेळाडूंच्या तुकडीचे नेतृत्व करणार आहेत, असे मांडविया म्हणाले.

भारताचे २५ पदके जिंकण्याचे लक्ष्य

दरम्यान, २८ ऑगस्टपासून पॅरिस पॅरालिम्पिक सुरू होणार असून यामध्ये भारताचे ८४ खेळाडू १२ क्रीडा प्रकारांत सहभागी होतील. २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने १९ पदके जिंकली होती. यावेळी भारताचे २५ पदकांचे लक्ष्य आहे. केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांच्या उपस्थितीत सर्व खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या. बॅडमिंटनपटू प्रमोद भगत मात्र या स्पर्धेला मुकणार असल्याने भारताला मोठा धक्का बसला आहे.

# समाजातील विविध घटकांतील नागरिकांनी रॉबिन हूड आर्मीला सहकार्य करावे : डॉ. उर्वी नागुरे




लातूर : रॉबिन हूड आर्मी ही शून्य पैसे घेऊन चालवण्यात येणारी स्वयंसेवी संघटना असून ती उपाशीपोटी राहणाऱ्या लक्षावधी लोकांना हॉटेल्स आणि मोठ्या कार्यक्रमात शिल्लक राहणारे अन्न संकलित करून ते पुरविण्याचे काम करते. या संघटनेला समाजातील विविध घटकातील लोकांनी सर्वतोपरी सहकार्य करावे,असे आवाहन लातूर रॉबिन हूड टीमच्या डॉ. उर्वी नागुरे यांनी शनिवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले.

आपल्या देशात ४०६ हुन अधिक शहरात अडीच लाखांहून अधिक सक्रिय सदस्य असणारी रॉबिन हूड आर्मीने आपला दहा वर्षांचा कालखंड पूर्ण केला आहे. या दशकपूर्तीचे औचित्य साधून रॉबिन हूड आर्मीच्या लातूर टीमच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. उर्वी नागुरे यांनी समाजाकडून एकही पैसा रोखीने न घेणाऱ्या या संघटनेच्या कार्याविषयी विस्तृत अशी माहिती दिली. लातुरात या संघटनेचे काम मागच्या सहा वर्षांपासून अविरतपणे सुरु आहे. संघटनेत सेवाभावी वृत्तीने काम करणारे अनेक सदस्य असून त्यांना म रॉबिन म असे संबोधले जाते. हे रॉबिन हॉटेल्स, मंगल कार्यालय, मोठ्या समारंभातून ताजे अन्न संकलित करून ते गरजूंपर्यंत पोहचवितात, असे सांगून डॉ. नागुरे म्हणाल्या की, लातूरच्या टीममध्ये वयाच्या सहाव्या वर्षांपासून ते पन्नास वर्षे वयापर्यंतचे रॉबिन कार्यरत आहेत. वाया जाणारे अन्न आम्हाला फोन आल्यापासूनच्या एका तासात संकलित करून ते गरजूंपर्यंत पोहचवले जाते. या संघटनेचा हेतू केवळ उपाशी असलेल्यांना अन्न उपलब्ध करून देणे एवढाच नसून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे हाही आहे. ज्या मुलांना शिक्षण मिळत नाही, त्यांच्यासाठी शिक्षणाची दारे उघडण्याचे कामही केले जात आहे. समाजातील विविध स्तरातील नागरिकांकडून ज्वारी, गहू, तांदूळ, डाळी , साखर, गूळ , शेंगदाणे, गोडेतेल असे अन्नधान्य संकलित करून ते गरजू कुटुंबांपर्यंत पोहचविले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

रॉबिन नंदन भुतडा यांनी यावेळी बोलताना समाजातील गरीब लोकांच्या पोटात चांगल्या, सकस अन्नाचे चार घास जावेत यासाठी आम्ही सर्व रॉबिन एकत्रित येऊन कार्य करतो असे सांगितले. गोरगरिबांना पनीरची भाजी, गुलाब जामून काय असते हेही माहिती नसल्याचे हे कार्य करताना आपल्या दृष्टीपथास आले तेव्हा खूप वाईट वाटले. मोठ्या समारंभात शिल्लक राहणाऱ्या अन्नाचा एक कणही वाया जाणार नाही याची दक्षता घेतली जात असल्याचे भूतदादा यांनी सांगितले. रॉबिन नवनाथ खांडेकर यांनी रॉबिन हूड आर्मीच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून देण्यात आले. तसेचत्यांच्या शिक्षणाचीही सोय करून देण्यात आली आहे. आपल्या टीमच्या प्रयत्नांमुळे दहावीच्या परीक्षेत काही विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपर्यंत गुण मिळवले असल्याचे त्यांनी नमूद केले. संघटनेच्या दशकपूर्ती निमित्त येत्या २५ ऑगस्टला लातुरात राजस्थान विद्यालयाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यापत्रकार परिषदेप्रसंगी प्रसाद बावगे, संगमेश येवणगे , पवन भोसले, कृष्णा देशमुख, वल्लभ अंधारे, ॲड. उमर शेख यासह अनेक रॉबिन उपस्थित होते.



# वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते विलास सहकारी साखर कारखान्याच्या रोलरचे पूजन

लातूर (प्रतिनिधी) दि. १६ ऑगष्ट २४: तालुक्यातील वैशालीनगर निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या हंगाम २०२४-२५ च्या गळीत हंगाम रोलरचे पूजन कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि. १६ ऑगस्ट रोजी करण्यात आले,

यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनंत देशमुख, डॉ. सारीका देशमुख, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, रेणा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक भिमराव मोरे, श्री. संत शिमोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे, जागृती शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर गणेश येवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

विलास सहकारी साखर कारखान्याने स्थापनेपासून आजपर्यंत सर्वच गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडले आहेत, आगामी गळीत हंगामाची तयारी सुरु करण्यात आली आहे, शुक्रवारी कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते रोलर पुजन झाले, या कार्यक्रमास कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, संचालक बंकट भिसे, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रजीत पाटील, गोविंद डुरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभास माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडिले, कार्यकारी संचालक संजीव देसाई यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# बोरगाव ते मुरुड अकोला रस्त्याचे काम अखेर सुरू

## आ. धिरज देशमुख यांनी जाब विचारल्यानंतर अधिकाऱ्यांना जाग



लातूर/प्रतिनिधी- लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी अधिकाऱ्यांना बोलावून घेवून ग्रामस्थांच्या समोर जाब विचारल्याने बोरगाव ते मुरुड अकोला रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. त्यामुळे ग्रामस्थांनी आ. धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले.

लातूर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला दरम्यानचा रस्ता रखडल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे बोरगाव येथे ग्रामस्थ व राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांची आ. धिरज विलासराव देशमुख यांनी मंगळवारी, १३ ऑगस्ट रोजी बैठक घेतली.

लातूर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला या रस्त्याचे चालू असलेले काम थांबवण्याबाबत कोणत्याही स्पष्ट सूचना नसताना या रस्त्याचे काम का थांबवण्यात आले, अशा शब्दात आ. धिरज विलासराव देशमुख यांनी राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांना जाब विचारला. रस्त्याचे काम तात्काळ सुरू झाले नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे या रस्त्याचे काम गुरुवार, १५ ऑगस्ट पासून सुरू करू, अशी ग्वाही राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांनी दिली होती.

त्यानुसार या रस्त्याचे काम गुरुवार, १५ ऑगस्ट पासून सुरू झाले आहे. त्यामुळे ग्रामस्थांना, वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. या प्रसंगी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चेअरमन सुरेश बाप्पा पांढरे, चेअरमन वीरसेन भोसले, सरपंच शिवराज बिडवे, उपसरपंच जयलिंग बिडवे, सुभाष बाळापुरे, बसवेश्वर चौंडे, नूर पठाण, स्वप्निल कोरे, गुरु पाटील, दिनेश मस्के, मुख्तार शेख, बाळासाहेब मुरलीधर बिडवे, धर्मराज बिडवे, आप्पासाहेब रोंगे, परमेश्वर गिराम, सचिन आंबेकर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आ. धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानले.



# श्री अनंतपाळ वाचनालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

शिरूर अनंतपाळ :-शहरातील श्री अनंतपाळ नवयुवक( तालुका - अ वर्ग )वाचनालयात ७८ वा.स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वाचनालयाचे सदस्य श्री विरभद्र भातांब्रे गुरुजी यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तर वाचनालयाचे चिटणीस डॉ. राजकुमार बोपलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सुरेश कोटलवार, सत्यनारायण बंग, सौ. उज्वला दुरुगकर, सौ. लता शेरसांडे, शोभाताई बेंजरगे, सौ.रंजना बोपलकर,पंडितराव शिंदाळकर, त्र्यंबकप्पा आवळे, बालाजी देवसटवार, मनोज दुरुगकर, शरद दुरुगकर, भरत दुरुगकर, शंकरराव बेंबळगे, अप्पाराव नाटकरे,उजेडे सर, इंदलकर सर,वैजनाथ संभाळे, नागनाथ भातांब्रे,संस्कार मोती सेमी इंग्लिश स्कुलचे संचालक शाम व्यजने,आशिष स्वामी, शिक्षक उत्सुर्गे मॅडम, शिंदाळकर मॅडम, चामले मॅडम, म्हेकरे मॅडम राम संभाळे,ग्रंथपाल ग्रंथमित्र काशिनाथ बोडके, सहायक ग्रंथपाल शिवनंदा चौसस्टे, अनंत सूर्यवंशी आदीसह संस्कार मोती सेमी इंग्लिश स्कुलचे विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रशासनाचे आश्वासन; महिलांचे उपोषण मागे

**लातूर / प्रतिनिधी-** घरकाम तसेच धुणे-भांडी करणाऱ्या महिलांच्या मागण्यांसंदर्भात शहरातील महात्मा गांधी चौकात स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येपासून बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेने आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल प्रशासनाकडून घेतली जात नव्हती. विविध सामाजिक संघटनांनी शुक्रवारी उपोषणस्थळी जाऊन पाठिंबा दिल्याने कामगार कल्याण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी येऊन उपोषण करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांची भेट घेतली. स्थानिक मागण्यांसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच शासनस्तरावर असलेल्या मागण्यांबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविले जातील, असे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. बहुजन महिला हक्क समिती संघटनेच्या अध्यक्षा लक्ष्मी कांबळे यांच्या नेतृत्त्वाखाली उपोषण सुरू होते.

# मनपा शाळांतील ११०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांची पालिकेच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली.यात ९७ विद्यार्थ्यांना काही समस्या असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

मनपाच्या वतीने लातूर शहरात एकूण १६ शाळा चालवल्या जातात.या शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेतात.या विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी रहावे या हेतूने मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि उपायुक्त(आरोग्य) डॉ.पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता कदम,डॉ. प्रकाश मुडपे,डॉ. श्यामा जाधव,डॉ. स्वाती मजगे,डॉ. शर्वरी महाजन,डॉ. आकांक्षा वाडेकर,डॉ. सारा सय्यद,डॉ. कविता काबरा आणि विशेष वैद्यकीय तज्ञामार्फत ही आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणी अंतर्गत विद्यार्थ्यांचे उंची, वजन सोबतच रक्त (हिमोग्लोबिन, अनेमिया), कान, नाक, घसा, डोळे, दात यांच्या विविध वैधकीय तपासणी करण्यात आले. यातील कांही विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक समस्या असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांना कान,नाक व घसा या संदर्भातील आरोग्य समस्या निष्पन्न झाल्या. तर ४६ विद्यार्थ्यांना दंतचिकित्सा गरजेची असल्याचे निदर्शनास आले. तर १६ विद्यार्थ्यांना डोळ्यांचे समस्या असल्याचे स्पष्ट झाले.या सर्व विद्यार्थ्यांना संदर्भिय आरोग्यसेवा देण्यात आली.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या आरोग्य समस्यावर याच वयात उपचार झाले तर भविष्यात व्याधी वाढणार नाहीत व नियमित आरोग्य तपासणी मुळे विद्यार्थी तंदुरुस्त राहतील यासाठी पालिकेने ही तपासणी मोहीम हाती घेतली होती.

# ज्यांचे फॉर्म रखडले, त्यांना तीन महिन्याचे एकदम ४५०० रु. देणार

पुणे : ही खटाखट खटाखट सारखी योजना नाही. ही फटाफट फटाफट चालणारी योजना आहे. आमच्या बहिणींच्या खात्यामध्ये थेट पैसे जात आहेत. ज्या बहिणींचे फॉर्म रखडले त्यांना तीन महिन्यांचे ४५०० रुपये एकदम देणार, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. पुण्यात आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज अतिशय आनंदाचा दिवस आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची औपचारिक सुरुवात पुणे येथे होत आहे. सुरुवात पुण्यापासून का? असे मला विचारले एकाने विचारले होते. ज्यावेळेस परकियांचे आक्रमण आमच्यावर झाले त्यावेळेस आई जिजाऊंनी स्वराज्याची संकल्पना शिवरायांना दिली. महिलांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला त्यावेळी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सांगितले की. महिलांना शिक्षणाचा अधिकार आहे. त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा याच पुण्यात सुरू केली. त्यामुळे पुणे हे महत्त्वाचे ठिकाण आहे असे त्यांनी म्हटले.

प्रत्येकाच्या खात्यात पैसे आल्याशिवाय योजना बंद होणार नाही

ते पुढे म्हणाले की, आपले सरकार देना बँक सरकार आहे. याआधीच सरकार लेना बँक सरकार होते. मागच्या काळातील सरकार वसुली करणारे सरकार होतं. आत्ताचे सरकार बहिणींना देणारे सरकार आहे. त्यामुळे आज आपण ठरवले पुण्यापासून सुरुवात करायची. पण पुण्यापासून जरी औपचारिक सुरुवात केली असली तरी मुख्यमंत्र्यांनी सांगितले पैसे क्रेडिट करणे सुरू करा. आता एक कोटी तीन लाख महिलांना त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये प्रत्येकी जमा झाले आहेत. आता थोड्या महिला बाकी आहेत. पण काळजी करू नका, प्रत्येकाच्या खात्यात पैसे आल्याशिवाय योजना बंद होणार नाही हा आमचा निर्धार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# वामनदादा व अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याने येथील मानवतावादी वैभव अधिक समृद्ध केले



लातूर / प्रतिनिधीः लोककवी वामनदादा कर्डक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने, केवळ मराठी वाङ्मयच नव्हे तर येथील, सर्वसामान्यांचे मानवतावादी वैभव अधिक समृद्ध केले असे प्रतिपादन, ज्येष्ठ कवी तथा साहित्यिक रमेशवराव हणमंते यांनी केले. ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी श्रावस्ती नगर लातूर येथे, परिवर्तनवादी साहित्यिक विचार मंचच्यावतीने, साहित्यरत्न अण्णाभाऊ व महाकवी कर्डक यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या, परिवर्तनवादी निमंत्रित कवी संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते. तर विचारपीठावर पुण्याचे ज्येष्ठ कथाकार सतिशराव सुर वसे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

यावेळी बोलताना कवीवर्य हणमंते पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी वैचारिक विचारांचे, वाङ्मयीन सारथ्य लोककवी वामनदादा व लोकशाहीर अण्णाभाऊ यांनी अगदी हिरीरीने केले. येथील अक्षित अशा आम सामान्य जनांच्या, माणूसपणाचा स्वाभिमानी दागिना या थोर साहित्यिकांनी आपल्या निर्मितीतून घडविला. बाबासाहेबांनी चालविलेल्या मानव मुक्ती चळवळींच्या प्रेरणेतून, प्रास्थापित साहित्याला हादरे देणा-या विद्रोही दलित साहित्य चळवळीचा जन्म झाला. त्यामुळे आजच्या लेखक व कविंनी आपल्या जाणिवेची बांधिलकी निश्चित करून, देश व समाजा पुढील आजच्या आव्हानाचा सामना करावा, असे आवाहन कवि रमेशराव हणमंते यांनी केले. प्रारंभी श्रावस्ती बुद्ध विहार येथे व्यवस्थापन समितीने, राष्ट्रीय ध्वजरोहण केले. त्यानंतर परिवर्तनवादी साहित्यिक विचार मंचच्यावतीने, काव्य संमेलनाध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ.आंबेडकर यांच्या शिल्पा तर अण्णाभाऊ व वामनदादा यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, सामूहिक अभिवादन केले.

या काव्य संमेलनामध्ये पांडूरंग वाघमारे, अँड. धम्मदिप बलांडे, छगन घोडके, सुनिल संसारे, विवेक डोळसे, देवदत्त सुर्यवंशी, रामदास कांबळे, सुरेखा भालेराव, हसिम पटेल, तौसिन सय्यद, ऍड. सुनिता हिरवे, रामभाऊ यादव, प्रा. पी एस बनसोडे, गोविंद गारकर, दत्ता सुरवसे, छाया ओव्हळ, गोविंद जाधव व कवि हणमंते आदींनी आपल्या काव्य रचना सादर केल्या. तर प्रमुख पाहुणे सतिश सुरवसे यांनी कथाकथन केले. यावेळी सहभागीना गौरव चिन्ह व सन्मानपत्र देण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याध्यक्ष विद्रोही दिलीप गायकवाड यांनी केले. तर प्रास्ताविक स्वागताध्यक्ष प्रा. विलास घारगावकर यांनी केले. आणि सचिव प्रदिप कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी डॉ. वैभवी घारगावकर, प्रा. प्रकाश अडसुळ, बिभीषण माने, प्रभाकर करवंजे, संजय गायकवाड, आनंद सोनेराव, लक्ष्मण कांबळे, दत्तात्रय भोसले, कु. ज्योती घारगावकर, वैशाली महालिंगे, सुधामती सोनवणे, स्वप्ना देडे, अनिता गवळी, छाया भोसले, प्रतिभा सावरे, संजिवनी गडेराव, मंगल धायगुडे, सुशीला सोनेराव, संजीवनी गुंजरगे, क्रांती हाके आदी उपस्थित होते.



# राजा नारायणलाल लाहोटी स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

लातूर / प्रतिनिधी- लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये गुरुवारी स्वातंत्र्यदिन उत्साहात आणि देशभक्तीच्या जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी, आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्रकुमार मालपाणी, स्कूलचे चेअरमन आनंद लाहोटी, संस्थेचे सदस्य हुकुमचंद कलंत्री, किशोर भराडिया, आशिष सोमाणी, चैतन्य भार्गव, संजय बियाणी आदी मान्यवरांची उपस्थित होते.

ध्वजारोहण समारंभानंतर विद्यार्थ्यांनी परेड आणि मिलिटरी बँडमध्ये सहभागी होऊन उत्तम सदरीकन केले. वैष्णवी बाजपायी, आर्या देशमुख या विद्यार्थिनींनी स्वातंत्र्य संग्रामाचा इति हास आपल्या भाषणातून मांडला. पारंपारिक लेझिम नृत्याच्या शानदार सादरीकरणासह देशभक्तीपर गीत गायनातून विद्यार्थ्यांनी उत्तम सादारीकरण केले. दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसह इतर विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नमन पत्तेवार व अपूर्वा गायकवाड यांनी सुत्रसंचलन केले. प्राचार्य कर्नल एस श्रीनिवासुलू यांनी आभार मानले.